महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA

सामान्य प्रशासन विभाग
GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

# महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम
# THE MAHARASHTRA GENERAL PROVIDENT FUND RULES

( दिनांक २० मे १९९८ पर्यंत सुधारलेले )
( *Corrected upto 20th May 1998* )

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, नागपूर यांच्याकडून भारतात मुद्रित
व संचालक, शासन मुद्रण व लेखनसामुग्री, महाराष्ट्र राज्य,
मुंबई ४०० ००४ यांच्याकडून प्रकाशित
२००८.

# अधिसूचना

सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक २०-५-९८.

## भारताचे संविधान

क्रमांक पीएफआर-१०९२/सीआर-५४-९३-तेरा-अ.—

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ याच्या परंतुकानुसार प्रदान करण्यात आलेले अधिकार आणि त्या बाबतीत मह शासनास शक्य असलेल्या इतर अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या असलेल्या सरकारी कर्मचाऱ्यांच्या संबंधातील भविष्य निर्वाह निधी नियमित करणारे नियम करीत आहेत, ते असे

१. **संक्षिप्त नाव.**—(अ) या नियमांना " महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम, १९९८ " असे म येईल.

(ब) हे नियम त्यांच्या **शासकीय राजपत्रातील** प्रसिद्धीच्या तारखेपासून अंमलात येतील.

२. **व्याख्या.**—या नियमात,

(१) " लेखा अधिकारी " म्हणजे,—

(अ) " ड " गटाच्या सेवेत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या संबंधात त्यांच्या कार्यालयाचे प्रमुख

(ब) इतर गटांच्या सेवांमध्ये असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या संबंधात, महालेखापाल, महाराष्ट्र र कार्यालयातील भविष्य निर्वाह निधी कक्षाचा (सेक्शन) प्रभारी शाखा (ब्रँच) अधिकारी होय.

(२) " वित्तलब्धी " म्हणजे, वेतन, रजावेतन आणि त्यामध्ये महागाई वेतन आणि स्वीयेतर सेवेच मिळालेल्या वेतनाच्या स्वरुपातील कोणत्याही पारिश्रमिकासह, महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण १ १९८१ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे निर्वाह वेतनाचा अंतर्भाव होतो.

(३) " **कुटुंब** " म्हणजे,—

(अ) पुरूष वर्गणीदाराच्या बाबतीत, वर्गणीदाराची बायको किंवा बायका, आईबाप, मुले, अज्ञान भा बहिणी, मयत मुलांच्या विधवा व मुले आणि वर्गणीदाराचे आईबाप हयात नसतील त्याबाबतीत पैतृक ३

परंतु, जर वर्गणीदार, त्याची पत्नी न्यायिकरित्या त्याच्या पासून विभक्त झाली आहे किंवा ती ज्य त्या जातीच्या रूढिगत विधीनुसार तिने निर्वाहाचा हक्क गमावलेला असेल असे सिद्ध करून दाखवीत ज्या बाबतीत लागू होतात, त्या बाबतीत ती व्यक्ती, यापुढे वर्गणीदाराच्या कुटुंबाची सदस्य मानलं तथापि, जर वर्गणीदार नंतर, अशी व्यक्ती त्याच्या कुटुंबातील सदस्य समजण्यात यावी, असे लेर लेखी कळवील, तर ती व्यक्ती वर्गणीदाराच्या कुटुंबातील व्यक्ती म्हणून समजण्यात येईल.

(ब) स्त्री वर्गणीदाराच्या बाबतीत, वर्गणीदाराचा पती, आईबाप, मुले, अज्ञान भाऊ, अविवाहित बहिणी, मृत मुलांच्या विधवा व मुले आणि वर्गणीदाराचे आईबाप हयात नसतील त्याबाबतीत पैतृक आजी आजोबा :

परंतु, जर त्या वर्गणीदाराने लेखी सुचनेद्वारे तिच्या पतीला तिच्या कुटुंबातून वगळण्यात यावे अशी इच्छा व्यक्त केली असेल, आणि त्या वर्गणीदाराने अशी लेखी सूचना रद्द केलेली नसेल तर, हे नियम ज्या बाबींच्या संबंधात लागू असतील त्या बाबींपुरते त्यास यापुढे वर्गणीदाराच्या कुटुंबाचा सदस्य समजण्यात येणार नाही.

**टीप.**—" मुले " म्हणजे औरस संतती व वर्गणीदारास लागू असलेल्या व्यक्तिगत कायद्यानुसार दत्तक ग्रहणास मान्यता मिळालेली असेल त्या बाबतीत दत्तक मुलांचा त्यात समावेश होतो.

(४) " निधी " किंवा " भविष्य निर्वाह निधी " म्हणजे या अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (ड) च्या तरतुदीन्वये घटित करण्यात आलेला महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी.

(५) " रजा " म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे रजा व त्यामध्ये अनेक प्रकारच्या रजांचा समावेश होतो.

(६) " वर्ष " म्हणजे वित्तीय वर्ष.

(७) " स्वीयेतर सेवा " म्हणजे ज्या सेवेसाठी शासकीय कर्मचाऱ्याला भारताच्या किंवा एखाद्या राज्याच्या किंवा एखाद्या संघराज्यक्षेत्राच्या एकत्रित निधी व्यतिरिक्त कोणत्याही इतर साधनांद्वारे शासनाच्या मंजुरीने, त्यांचे वेतन मिळते ती सेवा.

(८) " शासन " म्हणजे महाराष्ट्र शासन.

(९) " विभाग प्रमुख " म्हणजे, वेळोवेळी सुधारणा केल्याप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ यांच्या परिशिष्ट दोन मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांचा समावेश असलेले अधिकारी.

(१०) गट " ड " सेवा–" ड " गटातील सेवा म्हणजे, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र एसआरव्ही-१०८८-सीआर-१३-८८-बारा, दिनांक २९ जुलै, १९९३ अन्वये गट " ड " म्हणून वर्गीकृत केलेल्या सेवा तसेच त्यामध्ये रुपये १,१५० किंवा कमी एवढे जास्तीत जास्त वेतनमान असलेल्या इतर अवर्गीकृत अराजपत्रित पदांवरील सेवांचा अंतर्भाव होतो.

(११) **रजावेतन.**–" रजावेतन " म्हणजे रजेवर असलेल्या एखाद्या शासकीय कर्मचाऱ्याला शासनाकडून देण्यात आलेले मासिक वेतन.

(१२) या नियमात वापरण्यात आलेले शब्द व शब्दप्रयोग यांना भविष्य निर्वाह निधी अधिनियम (१९२५ चा अधिनियम क्र. १९) किंवा महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ यामध्ये जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच त्यांचे अर्थ असतील.

३. **निधीची रचना.**—भविष्य निर्वाह निधी भारतात रुपयांमध्ये ठेवण्यात येईल व या नियमान्वये त्याचे प्रदान देय झाल्यानंतर सहा महिन्याच्या आत न घेतल्यास अशी कोणतीही प्रदाने सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करण्यात येतील आणि ती प्रदाने वर्ष अखेरीस ठेवीमध्ये रुपांतरित करण्यात येतील व ठेवींच्या संबंधातील नियमांनुसार त्यांचा व्यवहार करण्यात येतील.

शासकीय कर्मचारी निधीचे वर्गणीदार होण्यास हक्कदार असतील.

४. **पात्रतेच्या शर्ती.**—(१) पोट-नियम (२) च्या तरतुदींना अधीन राहून एक वर्षाची अखंड सेवा पूर्ण केलेले सर्व अस्थायी शासकीय कर्मचारी, पुन्हा सेवेत घेतलेले सर्व निवृत्तीवेतनधारी आणि सर्व स्थायी शासकीय कर्मचारी हे निधीचे वर्गणीदार असतील :

परंतु ज्या कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यास अंशदायी भविष्य निर्वाह निधीचा वर्गणीदार होणे आवश्यक असेल किंवा तशी त्यास परवानगी दिली असेल, तो सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीचा वर्गणीदार होण्यास किंवा निधीचा वर्गणीदार म्हणून चालू राहण्यास पात्र असणार नाही.

आणखी असे की, अथवा उक्त अधिनियमाच्या कलम १७ अन्वये सूट देण्यात आलेली नसेल तर कर्मचारी भविष्य निर्वाह निधी व संकीर्ण उपबंध अधिनियम, १९५२ (१९५२ चा १९) या अन्वये तयार केलेल्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजना, १९५२ च्या तरतुदी ज्या संस्थेला किंवा कारखान्याला लागू होत असतील अशा संस्थेमधील किंवा कारखान्यातील अस्थायी शासकीय कर्मचाऱ्यांची सहा महिन्यांची अखंड सेवा अशा संस्थेमध्ये किंवा कारखान्यामध्ये अथवा उक्त अधिनियम लागू होत असेल अशा कोणत्याही इतर संस्थेमध्ये किंवा कारखान्यामध्ये अथवा काही अंशी एका संस्थेत आणि प्रकरणपरत्वे, इतर संस्थेत त्याच नियोक्त्याच्या नियंत्रणाखाली पूर्ण झालेली असेल अथवा त्याने तेथे सहा महिने किंवा त्यापेक्षा कमी कालावधीतील १२० दिवसांपेक्षा कमी नसेल एवढ्या कालावधीसाठी प्रत्यक्ष काम केले असेल तर त्याला सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीमध्ये अंशदान द्यावे लागेल.

(२) ज्याची नियमित रिक्त पदावर नियुक्ती झाली आहे आणि एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी ती चालू राहण्याची शक्यता आहे अशा तात्पुरत्या शासकीय कर्मचाऱ्याला एक वर्षाची अखंडीत सेवा पूर्ण होण्यापूर्वी निधीची वर्गणी भरता येईल.

**स्पष्टीकरण.**–(१) " अखंडीत सेवा " या संज्ञेला कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजना, १९५२ मध्ये जो अर्थ दिलेला आहे तोच अर्थ असेल व १२० दिवसांच्या कार्यकालाची गणना उक्त योजनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने करण्यात येईल आणि त्याप्रमाणे नियोक्त्याकडून प्रमाणित करण्यात येईल.

(२) शिकाऊ उमेदवार आणि परिवीक्षाधीन उमेदवार यांना अस्थायी शासकीय कर्मचारी समजण्यात येईल.

(३) केंद्र सरकारच्या सेवेतून किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतून राज्य शासनाच्या सेवेतील पदावर बदली झाल्यावर त्याची ती सेवा या नियमाच्या प्रयोजमार्थ नियम ४ च्या संदर्भात (सर्वसाधारण) भविष्य निर्वाह निधीमध्ये वर्गणी भरण्यास पात्र होण्यासाठी अखंडीत सेवा समजण्यात येईल आणि संबंधित व्यक्तीस ती नव्या पदावर रुजू झाल्यावर लगेचच वर्गणीदार होण्यास अनुमती देण्यात येईल व तिच्या खाती जमा असलेली रक्कम, नियम ३२ च्या अनुसार नव्या पदासाठी नियम ३२ च्या तरतुदीनुसार हस्तांतरित करण्यात येईल.

या नियमातील पोट-नियम (२) मध्ये विहित केलेल्या तारखेपासून ज्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्याने निधीचे वर्गणीदार होणे सक्तीचे असेल, तो प्रत्यक्ष वर्गणी भरीत आहे त्याला निश्चित सामील करून घेण्यात आले आहे, याची खात्री करून घेण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुखावर राहील.

नियम ४ च्या पोट-नियम (१) अन्वये निधीचे वर्गणीदार होण्यास पात्र असतील असे सर्व शासकीय कर्मचारी निधीमध्ये सामील होतील.

**टीप १.**—प्रत्येक कार्यालयाचा प्रमुख त्याच्या कार्यालयातील भविष्य निर्वाह निधीचा वर्गणीदार होणे सक्तीचे असेल अशा शासकीय कर्मचाऱ्यांचा (राजपत्रित व अराजपत्रित अशा दोन्ही) तपशील दर्शविणारे विहित नमुन्यातील विवरणपत्र, संबंधित महालेखापाल याना, प्रत्येक महिन्यांच्या १५ तारखेला पाठविल.

**टीप २.**—महालेखापाल, त्या विवरणपत्रात समावेश असलेल्या प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्यांना नेमून दिलेला खाते क्रमांक दर्शविणाऱ्या उक्त नमुन्याची एक प्रत परत करेल.

**टीप ३.**—ज्या कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीचे लेखे अनुक्रमे विभाग प्रमुख व जिल्हा परिषदा यांनी ठेवलेले असतील अशा " ड " गट सेवांमधील कर्मचाऱ्यांना वरील कार्यपद्धती योग्य त्या फेरफारांसह लागू होईल.

**टीप ४.**—भावी वर्गणीदारांचे विवरणपत्र विभागाने भरून महालेखापाल यांना कळवावे, भविष्य निर्वाह निधीमध्ये नवीन वर्गणीदार ज्या महिन्यात दाखल करून घेण्याचे प्रस्तावित केले असेल त्या महिन्याच्या तीन महिने अगोदर हे विवरणपत्र पाठविले पाहिजे.

**५. नामनिर्देशन.–**

(१) प्रत्येक वर्गणीदार, निधीचा वर्गणीदार होण्याच्या वेळी निधीमध्ये त्याच्या नावे जमा होईल अशी रक्कम त्याला देय होण्यापूर्वी किंवा ती देय झाली असूनही देण्यात आलेली नसेल, अशा वेळी त्याचा मृत्यू झाल्यास ही रक्कम मिळण्याचा हक्क एका किंवा अधिक व्यक्तींना प्रदान करणारे नामनिर्देशन कार्यालय प्रमुखांकडे पाठवील.

परंतु वर्गणीदार जर अज्ञान असेल, तर तो सज्ञान झाल्यानंतरच त्याने असे नामनिर्देशन करणे आवश्यक असेल,

आणखी असे की, नामनिर्देशन करतेवेळी जर वर्गणीदाराला स्वतःचे कुटुंब असेल, तर अशा बाबतीत तो केवळ त्याच्या कुटुंबातील सदस्याच्या किंवा सदस्यांच्या नावेच नामनिर्देशन करील.

तसेच वर्गणीदार भविष्य निर्वाह निधीचा वर्गणीदार होण्यापूर्वी त्याने इतर कोणत्याही भविष्य निर्वाह निधीसाठी करून दिलेले नामनिर्देशन हे जर पूर्वीच्या निधीमध्ये त्याच्या खाती जमा असलेली रक्कम अशा दुसऱ्या निधीत हस्तांतरित करण्यात आली असेल तर, या नियमानुसार ते नामनिर्देशन करेपर्यंत या नियमाखाली यथोचितरित्या करण्यात आलेले नामनिर्देशन असल्याचे समजण्यात येईल.

(२) पोट-नियम (१) अन्वये वर्गणीदाराने एकापेक्षा अधिक व्यक्तीचे नामनिर्देशन केले तर कोणत्याही वेळी निधीमध्ये त्याच्या खात्यावर जमा असलेल्या सर्व रकमेचा समावेश होईल अशाप्रकारे, तो प्रत्येक नामनिर्देशित व्यक्तीला देय असलेली रक्कम किंवा हिस्सा नामनिर्देशन नमुन्यात विनिर्दिष्ट करेल.

(३) प्रत्येक नामनिर्देशन, पहिल्या अनुसूचीत देण्यात आलेल्या नमुन्यामध्ये करण्यात येईल.

(४) वर्गणीदारास कोणत्याही वेळी लेखा अधिकाऱ्याला लेखी नोटीस देवून नामनिर्देशन रद्द करता येईल. वर्गणीदार या नियमाच्या तरतुदींनुसार नवीन नामनिर्देशन अशा नोटिसीसोबत किंवा स्वतंत्रपणे पाठवील.

(५) वर्गणीदारास नामनिर्देशनात अशी तरतूद करता येईल की,

(अ) कोणतीही विनिर्दिष्ट नामनिर्देशित व्यक्ती, वर्गणीदाराच्या आधी मृत्यू पावल्याच्या परिस्थितीत त्या नामनिर्देशित व्यक्तीला प्रदान करण्यात आलेला हक्क नामनिर्देशनपत्रात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना देण्यात येईल.

परंतु, जर वर्गणीदाराच्या कुटुंबात इतर सदस्य असतील तर अशा इतर व्यक्ती अशा सदस्य असेल किंवा सदस्य असतील.

या खंडान्वये वर्गणीदाराने एकापेक्षा जास्त व्यक्तींना असे हक्क प्रदान केले असतील त्याबाबतीत तो नामनिर्देशित व्यक्तीला देय असलेल्या संपूर्ण रकमेचा विनियोग होईल, अशाप्रकारे, प्रत्येक व्यक्तीला देय असलेली रक्कम किंवा हिस्सा विनिर्दिष्ट करील.

(ब) नामनिर्देशनात विनिर्दिष्ट केलेली आकस्मिक घटना घडून आली तर ते नामनिर्देशन विधिअग्राह्य होईल. नामनिर्देशन करण्याच्या वेळी वर्गणीदाराचे स्वतःचे कुटुंब नसेल तर, नंतर कुटुंब प्राप्त केल्यानंतर ते नामनिर्देशन विधिअग्राह्य ठरेल असे तो त्या नामनिर्देशनात नमूद करील : आणखी असे की, असे नामनिर्देशन करतांना वर्गणीदाराच्या कुटुंबात फक्त एकच व्यक्ती असेल तर, खंड (अ) खाली पर्यायी व्यक्तीला प्रदान करण्यात आलेला हक्क त्याच्या कुटुंबात नंतर आलेला सदस्य किंवा आलेले सदस्य यामुळे तो विधिअग्राह्य ठरेल अशी तो नामनिर्देशनात तरतूद करील.

(क) ज्या नामनिर्देशित व्यक्तीच्या बाबतीत पोट-नियम (५) च्या खंड (अ) अन्वये नामनिर्देशनपत्रात कोणतेही विशेष तरतूद केलेली नसेल अशा नामनिर्देशित व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्वरित किंवा पोट-नियम (५) च्या खंड (ब) अनुसार किंवा त्यातील तरतुदींनुसार ज्यामुळे नामनिर्देशन विधिअग्राह्य ठरेल अशी एखादी घटना घडेल तर वर्गणीदार, लेखाधिकाऱ्याला या नियमाच्या तरतुदींनुसार केलेल्या नवीन नामनिर्देशासह, नामनिर्देशन रद्द करणारी लेखी नोटीस पाठविल.

(ड) वर्गणीदाराने केलेले प्रत्येक नामनिर्देशन आणि जे रद्द करण्यासाठी त्याने दिलेली प्रत्येक नोटीस, ही विधिग्राह्य असेल त्या मर्यादेपर्यंत लेखा अधिकाऱ्याला ती ज्या दिनांकास मिळेल त्या दिनांकापासून परिणामक्षम राहील.

**टीप-(१).**—या नियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर "एक व्यक्ती" किंवा "अनेक व्यक्ती" ह्या शब्दप्रयोगात कंपनी किंवा सहा व्यक्तींची संस्था, मग ती विधी संस्थापित असो किंवा नसो, याचा समावेश असेल. यामध्ये मुख्यमंत्री सहाय्य निधी किंवा, मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियम, १९५० (१९५० चा मुंबई एकोणतीस) अन्वये नोंदणी करण्यात आलेल्या व खाजगी किंवा सार्वजनिक अशा कोणत्याही इतर धर्मादाय विश्वस्त संस्थेचा किंवा उक्त निधींच्या सचिवांमार्फत किंवा कार्यकारी अधिकाऱ्यामार्फत ज्याचे नामनिर्देशन करता येईल अशा निधीचा किंवा प्रदाने स्वीकारण्यास प्राधिकृत केलेल्या न्यासाचा समावेश असेल.

**टीप-(२).**—वर्गणीदारास कोणतेही कुटुंब नसेल किंवा या नियमामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे त्याचे कुटुंब बनणाऱ्या नामनिर्देशित व्यक्तीखेरीज इतर कोणतीही व्यक्ती नसेल तर नामनिर्देशित व्यक्तीचा अधिकार शेवटच्या स्तंभात नाव असलेली जी व्यक्ती ही त्याच्या कुटुंबाच्या सदस्याव्यतिरिक्त कोणतीही इतर व्यक्ती असेल त्या व्यक्तीकडे असेल.

**टीप-(३).**—वर्गणीदाराला, त्याच्या सेवानिवृत्तीनंतर, जोपर्यंत रक्कम चुकती केलेली नसेल तोपर्यंत तो सेवेत असतांना केलेले नामनिर्देशन बदलता येईल : परंतु या नियमांच्या तरतुदीनुसार उक्त नामनिर्देशन तयार केलेले व अधिसूचित केलेले असले पाहिजे.

**टीप-(४).**—नामनिर्देशित व्यक्तीच्या दाव्याला जर न्यायालयात आव्हान दिले आणि जर ही रक्कम नामनिर्देशित व्यक्ती व्यतिरिक्त इतर व्यक्तींना द्यावी असा न्यायालयाने हुकूम दिला तर नामनिर्देशित व्यक्तीला/व्यक्तींना प्रत्यक्ष रक्कम देण्यापूर्वी न्यायालयाच्या आदेशांचे अनुपालन करावे लागेल.

६. **वर्गणीदारांचे लेखे.**—(१) प्रत्येक वर्गणीदाराच्या नावे खाते उघडण्यात येईल व त्यात.—

(एक) त्याच्या वर्गणीची रक्कम ;

(दोन) नियम १२ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे त्यावरील व्याज ;

(तीन) बोनस, शासनाच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशान्वये त्याच्या खात्यावर जमा केलेली वेतनाच्या आणि भत्त्यांच्या थकबाकीची रक्कम ; आणि

(चार) निधीमधून घेतलेली अग्रीमे व काढलेल्या रकमा दाखविण्यात येतील.

(२) लेखा अधिकारी, त्याला शक्य होईल तेथवर प्रत्येक वर्गणीदाराला विहित नमुन्यातील लेखा विवरणपत्र पुढील वित्तीय वर्षाच्या सप्टेंबर अखेरीस पाठवील.

७. **वर्गणीच्या शर्ती आणि दर.**—(१) वर्गणीदार, तो निलंबित असतांनाचा कालावधी खेरीज करून दरमहा निधीमध्ये अंशदान देईल :

परंतु, वर्गणीदार रजेवर असेल त्याला रजावेतन मिळणार नसेल किंवा जे रजावेतन मिळणार असेल ते अर्धवेतनाइतके किंवा अर्ध सरासरी वेतनाइतके किंवा त्याहून कमी असेल तर रजेच्या काळात वर्गणी देणे हे त्याच्या स्वेच्छाधीन राहील ;

आणखी असे की, वर्गणीदार त्याच्या निलंबनाच्या कालावधीनंतर तो पुनःस्थापित झाल्यावर, त्या कालावधीत देय असलेल्या वर्गणीच्या थकबाकीची अधिकतम रक्कम एकरकमी किंवा हप्त्याने देण्याची त्याला मुभा असेल.

**टीप.**–(१) आस्थापनेतील हंगामी सेवेतील कर्मचाऱ्याला त्याच्या बेकारीच्या कालावधीतील निधीची वर्गणी भरणे आवश्यक असणार नाही.

**टीप.**–(२) वर्गणीदाराने, वेतन, वेतनवाढ, निवृत्तीवेतन इत्यादींसारख्या कोणत्याही प्रयोजनाकरिता मोजण्यात न येणाऱ्या अशा, सेवेचे दोन नियमित कालावधी जोडणाऱ्या खंडीत कालावधीत म्हणजेच " डाअेस-नॉन " या कालावधीत वर्गणी देण्याची आवश्यकता नसेल.

**टीप.**–(३) जर वर्गणीदार निधीत सामील झाला तर, त्याला वर्गणीच्या थकबाकीची रक्कम एका रकमेने किंवा हप्त्याने पुढील तारखेला भरण्यास अनुमती देण्यात येईल.

(२) पोट-नियम (१) च्या पहिल्या परंतुकात निर्देशित करण्यात आलेल्या रजेच्या कालावधीतील वर्गणी न भरण्याबाबत आपला निर्णय वर्गणीदार खालीलप्रमाणे कळवील.–

(अ) जर तो स्वतःचे वेतनदेयक स्वतःच तयार करणारा अधिकारी असेल तर तो रजेवर गेल्यानंतर त्याने तयार केलेल्या पहिल्या देयकात वर्गणीची वजात करणार नाही ;

(ब) जर तो स्वतःचे वेतन देयक स्वतःच तयार करणारा अधिकारी नसेल तर, रजेवर जाण्यापूर्वी कार्यालय प्रमुखाला तो तशी लेखी सूचना देईल.

**स्पष्टीकरण.**–(एक) वर्गणीदाराला यथोचित व योग्य वेळी सूचना द्यावी लागेल. अशी सूचना देण्यात आली नाही तर त्याने वर्गणी भरण्याचा निर्णय घेतला आहे असे समजण्यात येईल.

(दोन) या पोट-नियमाखाली वर्गणीदाराने कळविलेला विकल्प अंतिम असेल.

(३) नियम २९ अन्वये ज्या वर्गणीदाराने भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा असलेली रक्कम काढून घेतली असेल तो वर्गणीदार पुन्हा कामावर रूजू झाल्याखेरीज व रूजू होत नाही तोपर्यंत भविष्य निर्वाह निधी वर्गणी भरणार नाही.

(४) पोट-नियम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी वर्गणीदार, त्याच्या नियम सेवावधीनंतर त्याच्या निवृत्तीच्या शेवटच्या तीन महिन्यापूर्वी निधीमध्ये वर्गणी भरणार नाही.

८. **वर्गणीचे दर.**–(१) वर्गणीची रक्कम, खालील शर्तीच्या अधीन राहून वर्गणीदार स्वतः निश्चित करेल. त्या शर्ती अशा––

(अ) ती रक्कम पूर्ण रुपयांत दर्शविलेली असेल.

(ब) अशा रितीने दर्शविलेली कोणतीही रक्कम त्यांच्या वित्तलब्धीच्या ६ टक्के रकमेपेक्षा कमी नसेल आणि त्याच्या एकूण वित्तलब्धीपेक्षा जास्त नसेल ;

परंतु वर्गणीदार, जो यापूर्वीच शासकीय अंशदायी भविष्य निर्वाह निधीमध्ये १० टक्क्यांच्या उच्चतर दराने वर्गणी भरीत असेल अशा रीतीने दर्शविलेली रक्कम कितीही असली तरी, त्याच्या वित्तलब्धीच्या १० टक्क्यांपेक्षा कमी नसेल आणि त्याच्या एकूण वित्तलब्धीपेक्षा जास्त नसेल.

(क) शासकीय कर्मचारी जेव्हा कमीतकमी ६ टक्के दराने किंवा यथारिथती १० टक्के दराने वर्गणी भरण्याचा निर्णय घेईल तेव्हा रुपयाचा अपूर्णांक पुढील पूर्ण रुपयात करण्यात येईल.

(२) पोट-नियम (१) च्या प्रयोजनार्थ वर्गणीदाराची वित्तलब्धी पुढीलप्रमाणे असेल :—

(अ) निकटपूर्वीच्या वर्षाच्या ३१ मार्च रोजी शासकीय सेवेत असणाऱ्या वर्गणीदाराच्या बाबतीत त्या तारखेला त्यास जी वित्तलब्धी मिळण्याचा हक्क असेल ती वित्तलब्धी.

(ब) उक्त तारखेला जो रजेवर असेल व या रजेच्या कालावधीत वर्गणी न भरण्याचा निर्णय ज्याने घेतलेला आहे किंवा उक्त तारखेस जो निलंबनाधीन असेल त्या वर्गणीदाराच्या बाबतीत तो कामावर रूजू झाल्यानंतर पहिल्या दिवशी त्यास जी वित्तलब्धी मिळण्याचा हक्क असेल ती वित्तलब्धी.

(क) उक्त दिनांकास जो भारताच्या बाहेर प्रतिनियुक्तीवर असेल किंवा उक्त दिनांकास रजेवर गेला असेल व ज्याची रजा पुढे चालू असेल आणि त्याने अशा रजेच्या कालावधी दरम्यान वर्गणी भरण्याचा निर्णय घेतलेला असेल, अशा वर्गणीदाराच्या बाबतीत तो भारतात सेवेत असता तर, जी वित्तलब्धी मिळण्याचा त्याला हक्क असता ती वित्तलब्धी.

(ड) लगतपूर्वीच्या वर्षाच्या ३१ मार्च रोजी जो वर्गणीदार शासकीय सेवेत नव्हता त्याच्या बाबतीत, तो ज्या तारखेस निधीचा वर्गणीदार होईल त्या तारखेस त्याला जी वित्तलब्धी मिळण्याचा हक्क असेल ती वित्तलब्धी.

(३) वर्गणीदार प्रत्येक वर्षातील त्याच्या मासिक वर्गणीची रक्कम निश्चित करण्याची सूचना खालील रीतीने देईल.—

(अ) जर तो लगतपूर्वीच्या वर्षाच्या ३१ मार्च रोजी कामावर असेल तर, तो त्या महिन्याच्या त्याच्या वेतन देयकामधून यासाठी जी वजात करील ती रक्कम ;

(ब) जर तो लगतपूर्वीच्या वर्षाच्या ३१ मार्च रोजी रजेवर असेल आणि या रजेच्या कालावधीत वर्गणी न देण्याचा त्याने निर्णय घेतलेला असेल किंवा त्या तारखेस तो निलंबनाधीन असेल तर, कामावर रूजू झाल्यानंतर त्याच्या वेतन देयकात यासाठी तो जी वजात करील ती रक्कम ;

(क) जर त्यावर्षी शासकीय सेवेत तो प्रथमच प्रवेश करीत असेल तर तो निधीचा ज्या महिन्यात वर्गणीदार होईल त्या महिन्यात त्याच्या वेतन देयकात यासाठी जी वजात करील ती रक्कम ;

(ड) जर तो लगतपूर्वीच्या वर्षाच्या ३१ मार्च रोजी रजेवर असेल आणि त्याची रजा चालू असेल आणि त्याने या रजेच्या कालावधीत वर्गणी देण्याचा निर्णय घेतला असेल तर त्या महिन्याच्या वेतन देयकात त्याने याबाबतीत जी वजात करावयास लावली असेल ती रक्कम ;

(इ) जर लगतपूर्वीच्या वर्षाच्या ३१ मार्च रोजी तो स्वीयेतर सेवेत असेल तर, चालू वर्षातील एप्रिल महिन्याची वर्गणी म्हणून कोषागारामध्ये त्याने जमा केलेली रक्कम.

(४) अशाप्रकारे निश्चित केलेली वर्गणीची रक्कम.—

(अ) वर्षामध्ये कोणत्याही वेळी एकदाच कमी करता येईल,

(ब) वर्षामध्ये दोनदा वाढविता येईल, किंवा

(क) वरीलप्रमाणे कमी करता येईल आणि वाढविता येईल :

परंतु, अशाप्रकारे कमी केलेली वर्गणीची रक्कम ही पोट-नियम (१) मध्ये विहित केलेल्या किमान वर्गणीपेक्षा कमी असणार नाही :

आणखी असे की, जर वर्गणीदार कोणत्याही कॅलेंडर महिन्याच्या काही दिवसांसाठी अवैतनिक किंवा अर्धवैतनिक अथवा अर्ध सरासरी वेतनावरील रजेवर असेल आणि अशा रजेच्या कालावधीत वर्गणी न भरण्याचा पर्याय त्याने स्वीकारला असेल तर, देय असलेली वर्गणीची रक्कम ही वर निर्दिष्ट केलेल्या रजांव्यतिरिक्त असल्यास इतर कोणतीही रजा धरून त्याने काम केलेल्या दिवसांच्या प्रमाणानुसार होणारी रक्कम असेल.

९. **स्वीयेतर सेवेत बदली झालेल्या शासकीय कर्मचाऱ्याला नियम लागू करणे.**—जेव्हा एखाद्या वर्गणीदाराची स्वीयेतर सेवेत बदली केली असेल किंवा त्यास प्रतिनियुक्तीवर भारताच्या बाहेर पाठविले असेल, तेव्हा जणू काही त्याची बदली झालेली नव्हती किंवा त्याला प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आलेले नव्हते, असे समजून त्याला भविष्य निर्वाह निधीचे नियम लागू असतील.

१०. **वेतन व भत्त्याच्या थकबाकीची रक्कम निधीमध्ये जमा करणे.**—या नियमात काहीही अंतर्भूत असले तरी, वेतन किंवा भत्त्याच्या दरात सामान्यतः सुधारणा करण्यात आल्याने वेतन आणि महागाई यांची कोणत्याही वेळी वर्गणीदाराच्या नावे जमा होणारी थकबाकी राज्य शासनाने तसा आदेश दिल्यास निधीमध्ये त्याच्या खात्यावर जमा करण्यात येईल.

११. **वर्गणीची वसुली.**—(१) भारतातील सरकारी कोषागारातून किंवा भारताबाहेरील प्राधिकृत संवितरण कार्यालयातून जेव्हा वित्तलब्धीची रक्कम काढण्यात येते तेव्हा या वित्तलब्धीनुसार द्यावयाची वर्गणी आणि मूळ रक्कम व आगाऊ रकमेवरील व्याज यांची वसुली त्याच्या प्रत्यक्ष वित्तलब्धीमधूनच करण्यात येईल.

(२) जेव्हा वित्तलब्धी इतर कोणत्याही मार्गाने काढण्यात आल्या असतील तेव्हा वर्गणीदार स्वतःची मासिक देय रक्कम प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपूर्वी, " महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ " च्या नियम ११२ मधील तरतुदीनुसार एखाद्या ज्ञापनासहित किंवा नमुना म. को. नि. ६ अ (एम. टी. आर. ६-ए) मधील चलनासहित रोखीत धनादेशाद्वारे किंवा लेखा अधिकाऱ्याच्या नावे दर्शनी धनाकर्ष काढून (डिमांड ड्राफ्टद्वारे) किंवा " ८००५-राज्य भविष्य निर्वाह निधी " या प्रधान शिर्षाखाली शासनाच्या खात्यात जमा करेल आणि या शासनाच्या खात्यात भरणा केलेल्या वजाती वसुली यांचा तपशील दर्शविणारी " आगाऊ अनुसूची " असे सुस्पष्टपणे चिन्हीत केलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीच्या अनुसूचीची प्रत यथोचित रित्या अधिप्रमाणित केलेल्या चलनाच्या प्रतीसह लेखा अधिकाऱ्याकडे पाठविल :

परंतु, शासनाच्या मालकीची किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेली एखादी संस्था, महामंडळ किंवा मंडळ यांच्याकडे प्रतिनियुक्तीवर असलेल्या वर्गणीदारांच्या बाबतीत ती वर्गणी अशा संस्थेकडून, महामंडळाकडून किंवा मंडळाकडून वसूल करण्यात येईल व ती लेखा अधिकाऱ्याकडे पाठविण्यात येईल.

(३) जर एखाद्या व्यक्तीने ती ज्या दिवसापासून निधीची वर्गणीदार होणे आवश्यक आहे त्या दिवसापासून वर्गणी भरली नसेल किंवा नियम-७ मध्ये तरतूद केली आहे त्याखेरीज अन्यथा वर्षभरात कोणत्याही महिन्याची किंवा महिन्याची वर्गणी

देण्यात कसूर केली असेल तर वर्गणीची थकबाकी म्हणून निधीत जमा करावयाची एकूण रक्कम, नियम १२ मध्ये उपबंधित केलेल्या दराने त्यावरील व्याजासहित निधीमध्ये तात्काळ जमा करावी लागेल किंवा असे न केल्यास, ही रक्कम वर्गणीदाराला मिळणाऱ्या वित्तलब्धीमधून नियम १३ च्या पोट-नियम (एक), खंड (क) अन्वये जी आगाऊ रक्कम देण्यासाठी विशेष कारणांची आवश्यकता आहे अशी आगाऊ रक्कम मंजूर करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून निर्देश देण्यात येईल त्याप्रमाणे हप्त्याहप्त्याने किंवा इतर प्रकारे वर्गणीदाराच्या वित्तलब्धीमधील वजातीद्वारे वसूल केली जावी, असा आदेश लेखा अधिकाऱ्यास देता येईल.

परंतु, ज्या वर्गणीदाराच्या निधीमधील ठेवीबंद व्याज देण्यात येत नसेल त्याने असे व्याज भरणे आवश्यक असणार नाही.

**१२. व्याज.**–(१) पोट-नियम (५) च्या तरतुदींना अधीन राहून महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या हिशोबाच्या पद्धतीप्रमाणे प्रत्येक वर्षी निश्चित करण्यात येईल अशा दराने, वर्गणीदाराच्या खाती जमा असलेल्या रकमेवर शासन व्याज देईल :

परंतु, जर एखाद्या वर्षासाठी व्याजाचा दर ४ टक्क्यांपेक्षा कमी निश्चित करण्यात आला असेल तर, ज्या वर्षात ४ टक्क्यांपेक्षा कमी व्याजाचा दर प्रथमच निश्चित करण्यात आला असेल, त्या वर्षाच्या मागील वर्षामध्ये वर्गणीदाराच्या सर्व विद्यमान निधीवर ४ टक्के दराने व्याज देण्यात येईल :

परंतु, आणखी असे की, दुसऱ्या शासनाच्या इतर कोणत्याही भविष्य निर्वाह निधीचा जो यापूर्वी वर्गणीदार होता आणि ज्याची वर्गणी त्यावरील व्याजासहित नियम ३२ अन्वये त्याच्या खाती निधीमध्ये हस्तांतरित करण्यात आली असेल, अशा वर्गणीदाराला जर, या नियमांच्या पहिल्या परंतुकाच्या तरतुदीप्रमाणेच अशा इतर भविष्य निर्वाह निधीच्या नियमानुसार त्यास त्या दराने व्याज मिळत असेल तर त्या वर्गणीदाराला देखील ४ टक्क्याने व्याज देता येईल.

(२) **प्रत्येक वर्षातील शेवटच्या दिवसापासून व्याज खालीलप्रमाणे जमा केले जाईल.—**

(एक) चालू वर्षात काढून घेतलेल्या रकमा वजा करून मागील वर्षाच्या शेवटच्या दिवशी वर्गणीदाराच्या खाती जमा असलेल्या रकमेवर बारा महिन्याचे व्याज.

(दोन) चालू वर्षात काढून घेतलेल्या रकमेवर चालू वर्षाच्या सुरवातीपासून ज्या महिन्यात रक्कम काढून घेतली होती, त्याच्या मागील महिन्याच्या शेवटच्या दिवसापर्यंतचे व्याज.

(तीन) मागील वर्षातील शेवटच्या दिवसानंतर वर्गणीदाराच्या खाती जमा करण्यात आलेल्या सर्व रकमावर, त्या ठेवण्याच्या दिनांकापासून ते चालू वर्षाच्या अखेरीपर्यंतचे व्याज.

(चार) व्याजाची एकूण रक्कम नजिकच्या संपूर्ण रुपयात रुपांतरित केली जाईल, पन्नास पैसे ही रक्कम पुढील पूर्ण रुपया असल्याचे समजण्यात येईल :

परंतु, ज्या वर्गणीदाराच्या खाती जमा असलेली रक्कम देय होत असेल तेव्हा, यथास्थिती, चालू वर्षाच्या सुरवातीपासून किंवा ती रक्कम जमा झाल्याच्या दिनांकापासून, त्याच्या खाती जमा असलेली रक्कम देय होणार असेल त्या दिनांकापर्यंतच्या कालावधीसाठी या पोट-नियमाखाली त्या रकमेवरील व्याज त्याच्या खाती जमा केले जाईल.

(३) या नियमात, वित्तलब्धीमधून करण्यात आलेल्या वसुलीच्या बाबतीत, वसुली ज्या महिन्यात करण्यात आली असेल त्या महिन्याच्या पहिला दिवस हा ठेवीचा दिनांक असल्याचे समजण्यात येईल. आणि वर्गणीदाराने अग्रेषित केलेल्या

रकमेच्या बाबतीत त्या महिन्याच्या पाच तारखेच्या आत लेखा अधिकाऱ्याला ती रक्कम पोहचली असेल तर ती प्राप्त झालेल्या महिन्याचा पहिला दिवस आणि त्या महिन्याच्या ५ तारखेस किंवा त्यानंतर ही रक्कम पोहचली असेल तर लगतनंतरच्या महिन्याच्या पहिला दिवस हा ठेवीचा दिनांक असल्याचे समजण्यात येईल.

परंतु, त्या महिन्याची वित्तलब्धी, त्याच महिन्यांतील शेवटच्या कामाच्या दिवशी किंवा शेवटून दुसऱ्या कामाच्या दिवशी काढण्यात येत असेल व वाटली जात असेल तर वर्गणीच्या वसुलीच्या बाबतीत ठेवीचा दिनांक हा लगतनंतरच्या महिन्याचा पहिला दिवस असेल.

आणखी असे की, जेथे वर्गणीदाराचे वेतन किंवा रजावेतन आणि भत्ते काढण्यात विलंब झाला असेल आणि परिणामी निधीच्या वर्गणीची वसुली करण्यात विलंब झाला असेल तर कोणत्या महिन्यात ते दिले गेले हे लक्षात न घेता, वर्गणीदाराचे वेतन किंवा रजावेतन ज्या महिन्यात देय असेल त्या महिन्यापासून अशा वर्गणीवरील व्याज देय होईल.

तसेच नियम ११ च्या पोट-नियम (२) च्या परंतुकानुसार, अग्रेषित करण्यात आलेल्या रकमेच्या बाबतीत ही रक्कम लेखाधिकाऱ्याकडून महिन्याच्या पंधरा तारखेपूर्वी प्राप्त झाली असेल तर त्या महिन्याचा पहिला दिवस ठेवीचा दिनांक समजण्यात येईल.

(४) नियम २८, २९ किंवा ३० खाली देण्यात येणाऱ्या रकमेव्यतिरिक्त ज्या महिन्यात ही रक्कम दिली गेली त्या महिन्याच्या आधीच्या महिन्या अखेरपर्यंत किंवा ज्या महिन्यात देय होईल त्या महिन्यानंतरच्या सहाव्या महिन्याच्या अखेरपर्यंत यापैकी जो कालावधी कमी असेल त्या कोणत्याही कालावधीसाठी अशा रकमेवरील व्याज ज्या व्यक्तीला अशी रक्कम द्यावयाची असेल त्या व्यक्तीला देय होईल.

परंतु, लेखा अधिकाऱ्याने त्या व्यक्तीला किंवा तिच्या प्रतिनिधीला ज्या तारखेस ही रक्कम रोख देण्याचे तिला कळविले असेल किंवा या रकमेचा धनादेश ज्या तारखेस त्या व्यक्तीकडे टपालाने पाठविला असेल त्याबाबतीत असे कळविण्यात आल्याच्या किंवा यथास्थिती, धनादेश पाठविण्यात आल्याच्या तारखेच्या आधीच्या महिन्याच्या अखेरीपर्यंतच केवळ व्याज देय होईल.

तसेच, वर्गणीदाराच्या भविष्य निर्वाह निधीच्या खात्यामधील शिल्लक रक्कम लेखा अधिकाऱ्याने प्राधिकृत केली असेल परंतु ती रक्कम वर्गणीदार जेथे शेवटी कामावर होता त्या कार्यालयामार्फत किंवा यथास्थिती त्याच्या वारसाला एका महिन्याच्या कालावधीनंतर प्रत्यक्षपणे देण्यात आली असेल, तर या खंडात नमूद केलेल्या रकमेवरील व्याज, या खंडात नमूद केलेल्या तरतुदीच्या अनुसार, वर्गणीदारास किंवा यथास्थिती, त्याच्या वारसाला रक्कम ज्या तारखेला प्रत्यक्षपणे देण्यात आली असेल त्या तारखेपर्यंत गणण्यात येईल.

आणखी असे की, शासनाच्या मालकीच्या किंवा शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या एखाद्या मंडळाकडे किंवा महामंडळाकडे किंवा संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) खालील एखाद्या स्वायत्त संघटनेमध्ये प्रतिनियुक्तीवर असलेल्या वर्गणीदारास भूतलक्षी तारखेपासून अशा मंडळामध्ये/महामंडळामध्ये किंवा संघटनेमध्ये नंतर सामावून घेण्यात आली असेल त्याबाबतीत, त्या वर्गणीदाराच्या निधीमधील जमा रकमांवर देय होणारे व्याज मोजण्याच्या प्रयोजनार्थ त्याला सामावून घेण्यासंबंधीच्या आदेशाची तारीख ही वर्गणीदाराच्या खात्यावर जमा असलेली रक्कम देय झाल्याची तारीख मानण्यात येईल. तथापि, ती (तारीख) त्याला सामावून घेतल्याच्या तारखेपासून सुरू होणाऱ्या व सामावून घेतल्याच्या आदेशांच्या तारखेपर्यंच्या कालावधीमध्ये वर्गणी म्हणून वसूल केलेली रक्कम ही, केवळ या पोट-नियमाखाली व्याज देण्याच्या प्रयोजनार्थ, निधीची वर्गणी असल्याचे मानण्यात येईल, या शर्तीच्या अधिन असेल.

**टीप (१)**.–वर्गणीदाराच्या किंवा ज्याला रक्कम द्यावयाची आहे अशा व्यक्तिच्या आवाक्याबाहेरील परिस्थितीमुळे, प्रशासकीय विलंब झाला असल्याबद्दल पुढील अधिकाऱ्याची व्यक्तिशः खात्री झाल्यानंतर निधीच्या शिल्लक रकमेवरील व्याजाची रक्कम सहा महिन्यापेक्षा अधिक कालावधीने देण्यास त्या अधिकाऱ्याकडून अधिकृत मंजुरी देण्यात येईल :–

(अ) एका वर्षाच्या कालावधीपर्यंत लेखा अधिकारी ; आणि

(ब) कोणत्याही कालावधीपर्यंत लेखा अधिकाऱ्याच्या निकटच्या पर्यवेक्षीय अधिकारी (या शब्दप्रयोगात एका व्यक्तिच्या बाबतीत उप-महालेखापाल/वरिष्ठ महालेखापाल "ड" गटातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत महालेखापाल कार्यालय प्रमुख आणि जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बाबतीत जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा समावेश होतो) अशा प्रत्येक प्रकरणात त्याबाबतीत झालेल्या प्रशासकीय विलंबाची पूर्णपणे चौकशी करण्यात येईल. आणि आवश्यक असल्यास कारवाई करण्यात येईल.

(५) तात्पुरत्या पदावर काम करणाऱ्या वर्गणीदाराने सेवेतून मुक्त झाल्यावर नियम २८ च्या उपबंधानूसार त्याच्या खाती जमा असलेली रक्कम निधीत शिल्लक ठेवण्याचा निर्णय घेतला असेल तर अशा बाबतीत त्या रकमेवर सेवासमाप्तीनंतर सहा महिनेपर्यंत व्याज देण्यात येईल. परंतु शासकीय सेवेत त्याला पुन्हा कामावर घेण्यात आले तर त्याची वर्गणी ज्या तारखेस पुन्हा चालू करण्यात येईल त्या तारखेपासून ज्या ठेवी काढून घेतलेल्या नसतील त्या ठेवीवर व्याज देण्यास प्रारंभ करण्यात येईल.

(६) मुसलमान कर्मचाऱ्यांच्या बाबतीत जर त्याने व्याज घेण्याची आपली इच्छा नाही, असे लेखा अधिकाऱ्याला कळविले असेल तर त्याच्या खाती व्याज जमा करण्यात येणार नाही परंतु नंतर जर त्याने व्याजाची मागणी केली असेल, तर ज्या वर्षात अशी विनंती करण्यात आली असेल त्या वर्षातील पहिल्या दिवसापासून त्याच्या खाती व्याज जमा करण्यात येईल.

(७) नियम ११ च्या पोट-नियम (३) नियम २५ किंवा नियम २६ अन्वये ज्या रकमांवरील व्याज वर्गणीदाराच्या निधीमधील खात्यात पुन्हा जमा करण्यात आले असेल त्या रकमांवरील व्याज या नियमांच्या पोट-नियम (१) अन्वये क्रमशः विहित करण्यात येतील अशा दरांनी आणि शक्य असेल तेथवर या नियमात वर्णन केलेल्या पद्धतीनुसार निश्चित करण्यात येईल.

(८) वर्गणीदारने पैसे काढण्याच्या तारखेस त्याच्या खाती जमा असलेल्या रकमेपेक्षा जास्त रक्कम निधीतून काढली असल्याचे आढळून आले असेल तर त्या प्रकरणी अशी जास्त काढलेली रक्कम ही, निधीतून घेतलेले अग्रिम किंवा काढून घेतलेली रक्कम किंवा अंतिम प्रदान म्हणून काढलेली रक्कम यांच्या बाबतीतील जास्त काढलेली रक्कम यापैकी कोणतीही रक्कम असली तरीही, त्यावरील व्याजासह एका ठोक रकमेत त्याने ती रक्कम परत केली पाहिजे किंवा तशी त्याने ती परत केली नाही तर, वर्गणीदाराच्या वित्तलब्धीमधून एक ठोक रक्कम किंवा निर्धारित केल्याप्रमाणे योग्य हप्त्यांमध्ये रक्कम वजा करून ती वसूल करण्याचे आदेश सक्षम प्राधिकाऱ्याकडून देण्यात येतील. या पोट-नियमाच्या प्रयोजनार्थ, जादा काढलेल्या रकमेवर, पोट-नियम (१) अन्वये, रक्कम प्रत्यक्ष काढल्याच्या तारखेस असलेल्या भविष्य निर्वाह निधीच्या शिल्लक रकमेवर सर्वसाधारण दरापेक्षा २ १/२ टक्के अधिक दराने *व्याज आकारण्यात येईल. जास्त काढलेल्या रकमेवरील वसूल* केलेले व्याज हे. "००४९ व्याजाच्या जमा रकमा-०४, राज्य/संघराज्य क्षेत्र शासनाकडून मिळालेल्या व्याजाच्या रकमा-८०० इतर जमा रकमा" या शिर्षाखाली "भविष्यनिर्वाह निधीतून काढलेल्या जादा रकमांवरील व्याज" या स्वतंत्र उपशिर्षाखाली **शासकीय** लेख्यात जमा करण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—(१) या नियमान्वये विहित केलेल्या किमान दराने जे शासकीय कर्मचारी भविष्य निर्वाह निधीमध्ये वर्गणी भरत होते अशा शासकीय कर्मचाऱ्यांच्या संबंधात वेतनमानातील सुधारणेचा परिणाम म्हणून भविष्य निर्वाह निधीच्या वर्गणीची थकबाकी, ती ज्या महिन्यात देय असेल त्या महिन्यापासून देय (येणे) होईल वर्गणीच्या थकबाकीवरील व्याज, सुधारित वेतन नियमान्वये ज्या महिन्यात देणे बाकी होते त्या महिन्यात प्रत्यक्षपणे जमा केली गेली आहे तो महिना लक्षात न घेता त्या महिन्यापासून देय असेल.

(२) नियम ८ (१) (ब) नुसार अनुज्ञेय असलेली वर्गणीची कमाल रक्कम वर्गणीदाराच्या वित्तलब्धीपेक्षा जास्त असणार नाही, म्हणूनच कमाल अनुज्ञेय वर्गणीपेक्षा अधिक असलेल्या वर्गणीच्या रकमेवर व्याज देण्यात येणार नाही.

(३) वर्गणीदार बेपत्ता झालेला आढळल्यास, कर्मचाऱ्याला शोधून काढण्यात आलेले नाही अशा पोलिसांकडून मिळालेल्या अहवालाच्या तारखेपासून ६ महिन्यापर्यंतचे व्याज देण्यात येईल.

(४) जेव्हा वर्गणीदार नियत सेवावधीनंतर निवृत्त झाला असेल तेव्हा व्याज देण्यासाठी ६ महिन्याच्या कालावधीतून लगतपुर्वीचा महिना वगळण्यात येईल.

(५) जर रक्कम देण्याचा आदेश १५ तारखेनंतर देण्यात आला असेल तर, ती रक्कम पुढील महिन्यात देण्यात येईल व अशा प्रकरणात ज्या महिन्यात रक्कम देण्याचा आदेश देण्यात आला असेल त्या महिन्याचे पूर्ण व्याज देण्यात येईल.

१३. **निधीमधून मिळणारी अग्रिमे.**—(१) मंजुरी देणारा योग्य प्राधिकारी, कोणत्याही वर्गणीदाराला त्याच्या तीन महिन्यांच्या वेतनापेक्षा अधिक नसेल एवढी किंवा निधीमध्ये त्याच्या खाती जमा असलेल्या रकमेच्या निम्मी रक्कम यापैकी जी कमी असेल ती रक्कम खालील पैकी कोणत्याही एका प्रयोजनार्थ मंजूर करेल.

(अ) आजारपण, प्रसुती किंवा विकलांगता यासंबंधीचा खर्च भागविण्यासाठी आणि यात आवश्यक असेल तेथे, वर्गणीदार आणि त्याचे कुटुंबीय किंवा त्याच्यावर प्रत्यक्ष अवलंबून असलेली कोणतीही व्यक्ती यांच्या प्रवास खर्चाचाही अंतर्भाव होईल.

(ब) खाली नमूद केलेल्या प्रकरणात, उच्च शिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी आणि यात आवश्यक असेल तेथे, वर्गणीदार आणि त्याचे कुटुंबीय आणि प्रत्यक्षात त्याच्यावर अवलंबून असलेली कोणतीही व्यक्ती यांच्या प्रवासाच्या खर्चाचा समावेश असेल (एक) माध्यमिक शाळेच्या टप्प्यानंतर भारताबाहेर विद्याविषयक, तांत्रिक, व्यावसायिक किंवा व्यवसाय शिक्षण पाठ्यक्रमाचा खर्च भागविण्यासाठी आणि (दोन) उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर भारतातील कोणत्याही वैद्यकीय, अभियांत्रिकी किंवा इतर तांत्रिक किंवा विनिर्दिष्ट शिक्षणक्रमाचा खर्च भागविण्यासाठी.

परंतु, जर या शिक्षणाचा पाठ्यक्रम हा उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण होण्यापूर्वी सुरू होणाऱ्या कोणत्याही सैनिकी किंवा लष्करी शाळेतील सैनिकी शिक्षणाचा पाठ्यक्रम असेल तर खंड ''ब'' लागू होणार नाही.

(क) वर्गणीदार, त्याच्या कुटुंबातील एखादी व्यक्ती किंवा त्याच्यावर प्रत्यक्ष अवलंबून असलेली एखादी व्यक्ती यांना वाङनिश्चय किंवा विवाह किंवा इतर धार्मिक कार्यासाठी परंपरागत रूढीनुसार, आपल्या दर्जानुसार जो खर्च करणे तो खर्च भागविण्यासाठी.

(ड) वर्गणीदार, किंवा त्याच्या कुटुंबातील कोणतीही व्यक्ती किंवा त्याच्यावर प्रत्यक्ष अवलंबून असलेली एखादी व्यक्ती यांच्याविरूद्ध दाखल केलेल्या कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीचा खर्च भागविण्यासाठी या प्रकरणात याच प्रयोजनासाठी इतर कोणत्याही शासकीय मार्गाने अनुज्ञेय असलेल्या अग्रिमाशिवाय हे अग्रिम उपलब्ध करून देण्यात येईल.

**(इ) वर्गणीदाराने एखाद्या अभिकथित कार्यालयीन** गैरवर्तनाच्या किंवा त्याच्याविरूद्ध दाखल करण्यात आलेल्या **एखाद्या दाव्याच्या संबंधातील चौकशीमध्ये** स्वतःचा बचाव करण्यासाठी विधी व्यावसायिक नेमला असल्यास त्याच्या **बचावासाठी झालेला खर्च** भागविण्यासाठी.

(फ) आपली पदीय कर्तव्ये पार पाडीत असतांना कोणत्याही बाबींच्या संबंधात एखाद्या खाजगी पक्षकाराने वर्गणीदाराविरूद्ध दाखल केलेल्या कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीचा खर्च भागविण्यासाठी.

(ग) घराच्या किंवा सदनिकेच्या किंवा एखाद्या निवासस्थानाच्या बांधकामासाठी, एखाद्या भूखंडाच्या खरेदीचा खर्च भागविण्यासाठी अथवा शहर व औद्योगिक विकास महामंडळातर्फे (सिडकोतर्फे) किंवा महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातर्फे किंवा एखाद्या सहकारी संस्थेतर्फे किंवा एखाद्या खाजगी गृहशिल्पीकडून एखादा भूखंड किंवा सदनिका मिळविण्यासाठी द्यावयाची रक्कम देण्याकरिता किंवा वर्गणीदार त्यांचे कर्तव्ये पार पाडीत असतांना जेथे राहत असेल त्या ठिकाणी नवीन बांधकाम करणे किंवा त्यात भर घालणे किंवा त्यात फेरबदल करणे किंवा त्या घराची किंवा सदनिकेची निगा राखणे याचा खर्च भागविण्यासाठी.

(ह) दूरचित्रवणी संच किंवा प्रशीतक किंवा कपडे धुण्याचे यंत्र किंवा सूर्यचूल (सोलर कुकर) खरेदी करण्यासाठी करण्यात येणारा खर्च भागविण्यासाठी.

(२) योग्य मंजुरी अधिकारी विशेष परिस्थितीत, जर पोट-नियम (१) मध्ये नमूद कारणांव्यतिरिक्त इतर कारणांसाठी वर्गणीदाराला अग्रिम मिळणे आवश्यक आहे, अशी त्याची खात्री झाली तर, उक्त पोट-नियमामध्ये दिलेल्या द्रव्यविषयक कमाल मर्यादेपर्यंत, कोणत्याही वर्गणीदाराला अग्रिम मंजूर करू शकेल.

(३) पूर्वी घेतलेल्या अग्रीमाचे निदान बारा हप्ते किंवा त्या अग्रिमाचा शेवटचा हप्ता यापैकी जो आधी असेल त्याची परतफेड करेपर्यंत, विशेष कारण लेखी नोंदवून कोणत्याही वर्गणीदाराला पोट-नियम (१) मध्ये घालून दिलेल्या कमाल मर्यादेपेक्षा जादा अग्रिम मंजूर करण्यात येणार नाही.

(४) पोट-नियम (३) अन्वये अग्रिम मंजूर केले तर पूर्वीच्या वसूल न झालेल्या अग्रिमाची शिल्लक रक्कम पूर्वीच्या अग्रिमाच्या शेवटच्या हप्त्याची परतफेड करण्यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या अग्रिमात मिळवण्यात येईल आणि वसुलीचे हप्ते एकंदर रकमेच्या संदर्भात निश्चित केले जातील.

(५) अग्रिमाची रक्कम मंजूर करण्यात आल्यानंतर ज्या प्रकरणी अंतिम प्रदानाचे अर्ज नियम २८ च्या पोट-नियम (४) खालील टीप खंड २ (ब) या अन्वये लेखा अधिकाऱ्याकडे पाठविण्यात आले असतील अशा प्रकरणी ती रक्कम लेखा अधिकाऱ्याने प्राधिकृत केल्यानंतर काढण्यात येईल.

**टीप (१).**—या नियमाच्या प्रयोजनार्थ योग्य मंजुरी प्राधिकारी दुसऱ्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केले आहेत.

**टीप (२).**—नियम १३ पोट-नियम (१), खंड (ब) अन्वये पोट-नियम (३) च्या शर्ती शिथील करून, वर्गणीदाराला वर्षातून एकदा अग्रिम घेण्यास मुभा देण्यात येईल.

**टीप (३).**—अग्रिम काढण्यासाठी कागदोपत्री पुरावे सादर करण्याचा आग्रह धरला जाणार नाही. कर्मचाऱ्याने अर्ज करतेवेळी आजारपण, उच्चशिक्षण, घरदुरुस्ती किंवा इमारत बांधणे आणि लग्न याबाबत पुरेसा तपशील दिला तर तो पुरेसा असेल.

**टीप (४).**—ज्या पाठ्यक्रमासाठी/अभ्यासक्रमासाठी अग्रिम घेणे/रक्कम काढणे अनुज्ञेय आहे त्या पाठ्यक्रमांची/अभ्यासक्रमांची सूची परिशिष्ट (ब) मध्ये दिली आहे.

**टीप (५).**—जर घटनेनंतर अवाजवी उशीरा अर्ज सादर केला नसेल तर खर्च केल्यानंतरही अग्रिम मंजूर करता येईल.

**टीप (६).**—सेवेच्या शेवटच्या तीन महिन्यात कोणतेही तात्पुरते अग्रिम मंजूर केले जाणार नाही.

**टीप (७).**—एकत्रित रकमेची वसुली करण्यासाठी हप्त्यांची संख्या निश्चित करण्याची रीत परिशिष्ट "क" मध्ये स्पष्ट करण्यात आली आहे.

**१४. अग्रिमाची वसुली.**—(१) वर्गणीदाराकडून अग्रिमाची वसुली, मंजुरी प्राधिकारी निदेश देईल तितक्या समान मासिक हप्त्यामध्ये करण्यात येईल, परंतु, वर्गणीदारानेच तशी मागणी केलेली नसेल तर अशा हप्त्यांची संख्या बारापेक्षा कमी असणार नाही आणि चोवीस पेक्षा अधिक होणार नाहीत. नियम १३, पोट-नियम (२) खालील अग्रिमाची रक्कम, वर्गणीदाराच्या तीन महिन्यांच्या वेतनापेक्षा अधिक होईल अशा विशेष प्रकरणामध्ये मंजुरी प्राधिकारी अशा हप्त्यांची संख्या ३६ पेक्षा अधिक होणार नाही, अशाप्रकारे निश्चित करू शकेल. वर्गणीदारास आपल्या इच्छेनुसार, महिन्यातून एकापेक्षा अधिक हप्त्यांनी परतफेड करता येईल. प्रत्येक हप्ता संपूर्ण रुपयात असेल असे हप्ते ठरवता यावे म्हणून प्रसंगी अग्रिमाची रक्कम कमी किंवा जास्त करून घेतली जाईल.

(२) अग्रिमाची वसुली नियम ११ मध्ये वर्गणीच्या वसुलीबाबत तरतूद केलेल्या पद्धतीनुसार केली जाईल आणि ही वसुली अग्रिम ज्या महिन्यात काढण्यात आले त्यानंतरच्या महिन्याच्या वेतनापासून सुरू केली जाईल. वर्गणीदाराला जेव्हा निर्वाह अनुदान मिळत असेल किंवा तो कोणत्याही कॅलेंडर महिन्यात दहा दिवस किंवा त्याहून अधिक काळ रजेवर असेल आणि त्या कालावधीत रजा वेतन मिळणार नसेल किंवा हे रजा वेतन अर्धवेतनाच्या किंवा अर्धसरासरी वेतनाच्या बरोबर किंवा यथास्थिती त्यापेक्षा कमी असेल तर वर्गणीदाराच्या संमतीशिवाय अग्रिमाची वसुली केली जाणार नाही. अशी वसुली वर्गणीदाराने लेखी विनंती केल्यास, त्याला देण्यात आलेल्या वेतन अग्रिमाच्या वसुलीच्या कालावधीत मंजुरी प्राधिकारी स्थगित करू शकेल.

(३) जर वर्गणीदाराला मंजूर करण्यात आलेले आणि त्याने प्रत्यक्ष घेतलेले अग्रिम, नंतर त्याची संपूर्ण परतफेड होण्यापूर्वी नामंजूर करण्यात आले असेल तर घेतलेल्या अग्रिमाची संपूर्ण रक्कम किंवा शिल्लक रक्कम वर्गणीदाराला निधीमध्ये तात्काळ भरावी लागेल किंवा, त्यात कसूर झाल्यास नियम १३ च्या पोट-नियम (२) अन्वये विशेष कारणासाठी देण्यात येणाऱ्या अग्रिमास मंजुरी देणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याने निर्देशित केल्याप्रमाणे एक रकमी किंवा बारापेक्षा अधिक नाही अशा हप्त्यांमध्ये वर्गणीदाराला वित्तलब्धीपासून वजा करून वसूल करण्यात येईल ;

परंतु असे अग्रिम नामंजूर करण्यापूर्वी वर्गणीदाराला तसे कळविण्यात आल्यापासून पंधरा दिवसांच्या आत परतफेडीची सक्तीने वसुली का करण्यात येवू नये या संबंधीचा लेखी खुलासा मंजुरी अधिकाऱ्याकडे सादर करण्याची त्यास संधी देण्यात येईल, आणि जर उक्त कालावधीमध्ये वर्गणीदाराकडून स्पष्टीकरण सादर करण्यात आले तर, ते निर्णयाकरिता शासनाकडे पाठविण्यात येईल आणि जर त्याच्याकडून उक्त कालावधीमध्ये असे स्पष्टीकरण सादर करण्यात आले नाही तर, अग्रिमाच्या परतफेडीची, या पोट-नियमामध्ये विहित केलेल्या रीतीने वसुली करण्यात येईल.

(४) या नियमाखाली करण्यात येणारी वसुली ती जसजशी करण्यात येईल त्याप्रमाणे वर्गणीदाराच्या निधीमधील लेख्यात जमा करण्यात येईल.

**१५. अग्रिमाचा अयोग्य विनियोग.**—या नियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, नियम १३ अन्वये निधीमधून अग्रिम म्हणून काढलेली रक्कम, रक्कम काढण्याची मंजुरी ज्या प्रयोजनाकरिता देण्यात आली होती त्या प्रयोजनासाठी वापरली गेली नाही अशी जर मंजुरी अधिकाऱ्याला शंका आली, तर तो त्याला तशी शंका येण्याची कारणे वर्गणीदाराला कळवील व वर्गणीदाराला ती कळविण्यात आल्यापासून पंधरा दिवसांच्या आत पैसे काढण्याची मंजुरी ज्या प्रयोजनासाठी देण्यात आली होती त्या प्रयोजनाकरिता वर्गणीदाराकडून अग्रिम वापरण्यात आले किंवा कसे याबाबत लेखी स्पष्टीकरणे करण्यास

वर्गणीदारास फर्मावतील. जर वर्गणीदाराने केलेल्या स्पष्टीकरणाने मंजुरी प्राधिकाऱ्याचे समाधान झाले नाही तर, तो प्राधिकारी वर्गणीदारास अग्रिमाची रक्कम निधीत तात्काळ परत भरण्याचा निदेश देईल किंवा तसे न केल्यास वर्गणीदाराच्या वित्तलब्धीमधून जरी तो रजेवर असला तरी, एकाच ठोक रकमेत किंवा बारापेक्षा जास्त होणार नाहीत अशा मासिक हप्त्यांनी वजात करून ती रक्कम वसूल करण्याचा आदेश देईल.

**टीप.**—या नियमातील " वित्तलब्धी " या संज्ञेत निर्वाह भत्त्याचा समावेश होत नाही.

**१६. निधीमधून रक्कम काढणे.**—नियम १३, पोट-नियम (२) अन्वये अग्रिम मंजूर करण्यास सक्षम असणाऱ्या प्राधिकाऱ्यांना विशेष कारणास्तव उक्त नियमात विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींना अधीन राहून पुढीलपैकी कोणत्याही वेळी रक्कम काढण्यास मंजुरी देता येईल.

(अ) एखाद्या वर्गणीदाराची वीस वर्षांची सेवा पूर्ण झाल्यानंतर (सेवेत खंड झालेला असल्यास खंडीत सेवेचा समावेश करून) अथवा त्याचा नियत सेवावधी पूर्ण होऊन तो सेवानिवृत्त होण्यापूर्वी दहा वर्षे, यापैकी जी घटना अगोदरची असेल त्यावेळी, वर्गणीदाराच्या खाती जमा असलेल्या निधीच्या रकमेतून पुढीलपैकी एका किंवा अनेक प्रयोजनार्थ म्हणजेच :—

(१) खालील बाबतीत, वर्गणीदार व त्याच्या कुटुंबातील व्यक्ती किंवा त्याच्यावर प्रत्यक्ष अवलंबून असलेली कोणतीही व्यक्ती यांच्या आवश्यक असेल तेथे प्रवास खर्चासह, उच्च शिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी जसे,—

(अ) माध्यमिक शाळेच्या टप्प्यानंतरचा शैक्षणिक तांत्रिक, व्यावसायिक किंवा धंदाविषयक पाठ्यक्रम भारताबाहेर पूर्ण करण्याकरिता, आणि

(ब) माध्यमिक शाळेच्या टप्प्यानंतरचा वैद्यकीय, अभियांत्रिकी किंवा इतर तांत्रिक किंवा विशेषीकृत पाठ्यक्रम, किंवा माध्यमिक शाळेच्या टप्प्याखालील सैनिकी किंवा लष्करी शाळेतील प्रशिक्षणे पूर्ण करण्याकरिता.

(२) वर्गणीदार अथवा त्याचे मुलगे किंवा मुली अथवा त्यांच्यावर प्रत्यक्षपणे अवलंबून असलेली त्याची स्त्री, नातेवाईक यांच्या वाङ्निश्चय किंवा विवाह या संबंधातील खर्च भागविण्याकरिता.

(३) वर्गणीदार आणि त्याच्या कुटुंबातील व्यक्ती किंवा प्रत्यक्षपणे त्याच्यावर अवलंबून असलेली अन्य व्यक्ती यांच्या संबंधातील आजारपणाचा आवश्यक असेल तर प्रवास खर्चासह खर्च भागविण्यासाठी.

(ब) वर्गणीदाराची सेवा १० वर्षे पूर्ण झाल्यानंतर (सेवेत खंड पडला असल्यास खंडीत सेवेचा समावेश करून) किंवा नियत वयोमान झाल्यामुळे तो ज्या तारखेस सेवानिवृत्त होईल त्या तारखेपूर्वी १० वर्षांच्या कालावधीत यापैकी जी घटना अगोदरची असेल त्यावेळी निधीमध्ये त्याच्या खात्यामध्ये जमा असलेल्या रकमेतून पुढीलपैकी एका किंवा अनेक प्रयोजनार्थ :—

(एक) त्याला राहण्यासाठी योग्य असे घर किंवा सदनिका बांधण्यासाठी किंवा घेण्यासाठी, तयार सदनिका घेण्यासाठी यात जागेच्या खर्चाचा समावेश आहे ;

(दोन) त्याला राहण्यासाठी योग्य असे घर बांधण्यासाठी किंवा घेण्यासाठी किंवा तयार सदनिका घेण्यासाठी घेतलेले कर्ज असे जेथे स्पष्टपणे म्हटलेले असेल, अशा कर्जाच्या रकमेची परतफेड करण्यासाठी ;

(तीन) त्याला राहण्यासाठी घर बांधण्याकरिता जागा घेण्यासाठी किंवा या प्रयोजनार्थ घेतलेले कर्ज असे जेथे स्पष्टपणे म्हटलेले असेल, अशा कोणत्याही कर्जाची उर्वरित रक्कम फेडण्यासाठी ;

(चार) पूर्वीपासूनच वर्गणीदाराच्या मालकीच्या असलेल्या किंवा त्याने घेतलेल्या घराची किंवा सदनिकेची पुनर्रचना करणे किंवा त्यात भर घालणे त्यामध्ये फेरफार करणे किंवा त्यांची दुरूस्ती यांसाठी ;

(पाच) कामाच्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्यत्र असलेल्या वडिलोपार्जित घराचे अथवा शासनाकडून कर्ज घेऊन कामाच्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्यत्र बांधलेल्या घराचे नवीकरण त्यात भर घालणे किंवा त्यात फेरफार करणे अथवा त्याची दुरूस्ती करणे यासाठी ;

(सहा) उपखंड (तीन) अन्वये खरेदी केलेल्या जागेवर घर बांधण्यासाठी.

(क) वर्गणीदाराच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपूर्वीच्या एक वर्षाच्या कालावधीत त्याच्या नावे निधीमध्ये जमा झालेल्या रकमेतून शेतीसाठी जमीन किंवा व्यवसायाकरिता जागा खरेदी करण्यासाठी किंवा दोन्ही प्रयोजनार्थ.

(ड) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक डीओआय-२०८१/४७०१/ए.डी.एम-५, दिनांक २६-४-१९८२ अन्वये राज्य शासनाद्वारे त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी अंशदाय पद्धतीने आपली आपण वित्त व्यवस्था करण्याच्या स्वरूपात राबविण्यात येणाऱ्या गट विमा योजनेत वर्गणीदाराने भरलेल्या वार्षिक वर्गणीच्या समतुल्य रक्कम वित्तीय वर्षाच्या कालावधीत एकदा भरण्यासाठी.

(इ) वर्गणीदाराच्या सेवेची १५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर किंवा नियत सेवावधीनंतर सेवानिवृत्त होण्याच्या पाच वर्षे आधी, यापैकी जी अगोदर असेल त्या तारखेस, नियम १८ खालील टिप्पणीत दिलेल्या शर्तीच्या अधीन, मोटार-गाडी खरेदी करण्यासाठी किंवा स्पष्टपणे या प्रयोजनासाठी घेतलेल्या शासकीय कर्जाची परतफेड करण्यासाठी.

(फ) वर्गणीदाराची सेवा १५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर (मध्ये खंड झाला असल्यास खंडीत सेवेचा समावेश करून) नियम १८ खालील टिप्पणीत दिलेल्या शर्तीच्या अधीन राहून, मोटारगाडी नोंदविण्याकरिता रक्कम, भरण्यासाठी किंवा मोटारसायकल किंवा स्कुटर किंवा मोपेड इ. खरेदी करण्यासाठी.

(ग) वर्गणीदाराची सेवा अठ्ठावीस वर्षे पूर्ण झाल्यानंतर (मध्ये खंड झाला असल्यास खंडीत सेवेचा समावेश करून) किंवा नियत सेवावधीनंतर सेवानिवृत्तीच्या तारखेपूर्वी तीन वर्षांच्या दरम्यान, यापैकी जे अगोदर असेल तेव्हा नियम १८ खालील टिप्पणीमध्ये दिलेल्या शर्तीच्या अधीन राहून मोटारगाडीची मोठी दुरूस्ती किंवा संधारण (ओव्हर हॉलिंग) करण्याच्या प्रयोजनार्थ.

**टीप (१).**–ज्या वर्गणीदाराला "कमी उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेखाली" किंवा मुंबई वित्तीय नियम, १९५९ (वेळोवेळी सुधारणा केल्याप्रमाणे) याच्या नियम १३४ अन्वये घरबांधणीसाठी मंजूर केलेले अग्रिम मिळालेले असेल किंवा या बाबतीत त्याला अन्य कोणत्याही प्रकारे शासनाकडून कोणतेही सहाय्य देण्यात आले असेल तर तो वर्गणीदार नियम २०, पोट-नियम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेस अधीन राहून खंड (एक) व (तीन) अन्वये, त्या खंडामध्ये विनिर्दिष्ट प्रयोजनार्थ, तसेच उपरोक्त योजनेखाली घेतलेल्या कोणत्याही कर्जाची परतफेड करण्याच्या प्रयोजनार्थ, अंतिमरीत्या रक्कम काढण्यासाठी मंजुरी मिळण्यास पात्र असेल. वर्गणीदाराचे वडिलोपार्जित घर असेल किंवा त्याने शासनाकडून कर्ज घेऊन त्याच्या कामाच्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्यत्र एखादे घर बांधले असेल तर, खंड (ब) चे उपखंड (एक), (तीन) व (चार) अन्वये त्याच्या कामाच्या ठिकाणी घरासाठी जागा खरेदी करण्यासाठी किंवा दुसरे घर बांधण्याकरिता अथवा त्याला राहण्यासाठी तयार सदनिका घेण्यासाठी अंतिमरीत्या रक्कम काढण्यासाठी मंजुरी मिळण्यास तो पात्र असेल.

**टीप (२).**–वर्गणीदाराने, तो जर घर बांधणार असेल तर त्या घराचा किंवा तो जर आपले घर वाढवून घेणार असेल किंवा त्यात फेरफार करणार असेल तर त्यासंबंधीचा, घर किंवा त्या घराची जागा ज्या क्षेत्रात असेल त्या क्षेत्राच्या स्थानिक नगरपालिकेने यथोचितरीत्या मान्य केलेला नकाशा सादर केल्यानंतर आणि तो नकाशा प्रत्यक्षपणे मान्य असला तरच खंड "ब" च्या उपखंड (एक) आणि (चार), (पाच), किंवा (सहा) अन्वये रक्कम काढण्यास मंजुरी देण्यात येईल.

**टीप (३).**–घराची जागा किंवा घर पत्नीच्या अथवा पतीच्या नावे असले तरीही खंड "ब" च्या उपखंड (एक) आणि (चार) अन्वये निधीमधून रक्कम काढता येईल, परंतु वर्गणीदाराने केलेल्या नामनिर्देशनामध्ये ती किंवा तो निधीची रक्कम घेणारी पहिली नामनिर्देशित व्यक्ती असणे आवश्यक आहे.

**टीप (४).**–या नियमाखाली एका प्रयोजनासाठी फक्त एकदाच रक्कम घेता येईल. परंतु त्याच्या प्रत्येक मुलाचा विवाह किंवा त्या मुलाचे शिक्षण किंवा निरनिराळ्या वेळी उद्भवणारे आजार किंवा त्याचे घर अथवा सदनिका यात आणखी वाढ करणे अथवा त्यात फेरफार करणे या बाबी एकच प्रयोजन असल्याचे समजण्यात येणार नाही. खंड "ब" उपखंड (एक) किंवा (चार) अन्वये या नियमान्वये घालून दिलेल्या मर्यादेपर्यंत दुसऱ्यांदा किंवा त्यानंतर निधीमधून रक्कम काढता येईल.

**टीप (५).**–नियम १३ अन्वये त्याच प्रयोजनार्थ त्याचवेळी अग्रिम मंजूर करण्यात येत असेल तर या नियमाखाली रक्कम काढण्यास मंजुरी देण्यात येणार नाही.

**१७. परतावायोग्य अग्रिम मंजूर करण्याचा प्राधिकार.**–(१) एखादा वर्गणीदार सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी लेख्याच्या अद्ययावत उपलब्ध विवरणाच्या संदर्भात व त्याचप्रमाणे त्यानंतर निधीमध्ये केलेल्या अंशदानाच्या संदर्भात भविष्यनिर्वाह निधीमध्ये त्याच्या नावे जमा रकमेसंबंधी सक्षम प्राधिकाऱ्याची पुराव्यानिशी खात्री करवून देवू शकला तर, सक्षम प्राधिकारी परतावायोग्य अग्रिमाच्या प्रकरणी असल्याप्रमाणे विहित कालमर्यादेत रक्कम काढण्याची परवानगी देवू शकेल. असे करीत असतांना त्याने वर्गणीदारासाठी अगोदरच काही रक्कम काढण्यास मंजुरी दिली असेल किंवा परतावायोग्य अग्रिम मंजूर केले असेल तर तेही विचारात घेईल.

(२) तथापि, वर्गणीदार त्याच्या नावे जमा रकमेच्या संदर्भात सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री करू शकत नसेल तर किंवा जेवढ्या रकमेकरता अर्ज केला असेल ती रक्कम अनुज्ञेय आहे किंवा नाही यासंबंधी कोणतीही शंका असेल तर, काढावयाची किती रक्कम अनुज्ञेय असेल हे ठरविणे सक्षम प्राधिकाऱ्यास शक्य व्हावे म्हणून वर्गणीदाराच्या नावे किती रक्कम जमा आहे हे माहिती करून घेण्यासाठी सक्षम प्राधिकारी लेखा अधिकाऱ्याकडे पत्रव्यवहार करू शकेल.

(३) निधीमधून रक्कम काढण्यास मंजुरी देणाऱ्या आदेशामध्ये सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी लेखा क्रमांक ठळकपणे नमूद करण्यात येईल आणि रक्कम काढण्यास मंजुरी देणाऱ्या आदेशाची एक प्रत न चुकता त्या लेखा अधिकाऱ्यास पाठविण्यात येईल.

(४) खातेवहीत वर्गणीदाराच्या लेख्यामध्ये रक्कम काढण्यास मंजुरी देणाऱ्या आदेशाची नोंद करण्यात आली आहे, यासंबंधीची पोच लेखा अधिकाऱ्याकडून मिळाल्याची खात्री करून घेण्याची जबाबदारी, मंजुरी प्राधिकाऱ्याची असेल.

(५) काढण्यास मंजुरी देण्यात आलेली रक्कम वर्गणीदाराच्या खात्यावर जमा रकमेपेक्षा अधिक आहे किंवा अन्यप्रकारे अग्राह्य आहे, असे लेखाधिकारी कळवील तर, वर्गणीदाराने घेतलेली असेल तेवढी रक्कम तो निधीमध्ये ताबडतोब एकरकमी भरेल आणि अशी रक्कम परत करण्यात त्याने कसूर केल्यास ती रक्कम वर्गणीदाराच्या वित्तलब्धीमधून एकरकमी अथवा शासनाकडून निश्चित करण्यात येतील अशा मासिक हप्त्यांनी वसूल करण्याबाबतचा आदेश मंजुरी प्राधिकाऱ्याकडून देण्यात येईल.

१८. रकमा हप्त्यांनी काढता येणे.---

(१) रक्कम काढणे पुढीलप्रमाणे अनुज्ञेय असेल :---

(अ) नियम १६, खंड (अ) खाली येणाऱ्या प्रकरणांत, वर्गणीदाराने विनिर्दिष्ट केलेल्या सोयीस्कर हप्त्यांमध्ये दिली जाईल आणि आधीचा हप्ता, ज्या कारणासाठी घेण्यात आला त्याच कारणासाठी त्याचा पुरेपूर उपयोग केला आहे याची खात्री करून घेतल्यानंतर पुढील हप्ता देण्यात येईल.

(ब) नियम १६, खंड अ, उपखंड (१) खाली येणाऱ्या प्रकरणात, प्रत्यक्ष विवाह होणार असेल त्या महिन्याच्या तीन महिन्यांहून आधी रक्कम देण्यात येवू नये.

(क) नियम ६, खंड ब, उपखंड (चार) व (सहा) खाली येणाऱ्या प्रकरणांत दोनपेक्षा कमी नाही आणि चारपेक्षा जास्त नाही अशा समान हप्त्यांत रक्कम देण्यात येईल. प्रत्येक हप्ता बांधकामाची प्रगती पाहून स्वतंत्रपणे मंजूर केला जाईल :

परंतु, जागेची किंमत धरून एखाद्या घराच्या खरेदीसाठी किंवा रक्कम काढतेवेळी ताबा घेण्यास योग्य असलेल्या कोणत्याही फ्लॅटच्या मालकी तत्त्वावर खरेदीसाठी किंवा उक्त प्रयोजनापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी घेतलेल्या कर्जाच्या उर्वरित रकमेची परतफेड करण्यासाठी काढून घेण्यात येणारी रक्कम वर्गणीदाराच्या विनंतीवरून एका हप्त्यात दिली जाईल.

(ड) ती रक्कम नियम १६, पोट-नियम (३), खंड (ब) च्या उपखंड (तीन) खाली येणाऱ्या प्रकरणात वर्षातून एकदा देण्यात येईल.

**टीप (१)**.---याच कारणासाठी घेतलेले परतावायोग्य अग्रिम खंड (ड) प्रयोजनार्थ, अंतिमतः काढून घेतले असल्याचे समजण्यात येईल.

**टीप (२)**.---मोटारकार खरेदी करण्याच्या बाबतीत अधिकाऱ्याचे मूळ वेतन दरमहा रु. ३,५०० किंवा त्याहून अधिक आणि मोटार सायकल व स्कूटर खरेदी करण्याच्या बाबतीत मूळ वेतन दरमहा १,५०० किंवा त्याहून अधिक असावयास हवे.

**टीप (३)**.---वर्गणीदाराकडून काढण्यात येणारी रक्कम, ही मोटारगाडी खरेदीसाठी रु. ५०,००० आणि मोटार सायकल/स्कूटर खरेदीसाठी रु. १०,००० किंवा सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीमध्ये वर्गणीदाराच्या खाती जमा असलेल्या रकमेच्या निम्मे किंवा मोटारगाडी/मोटारसायकल/स्कूटर यांची प्रत्यक्ष किंमत यापैकी जी कमी असेल त्या रकमेइतकी मर्यादित असेल.

**टीप (४)**.---नियम १६, खंड (इ) व (फ) च्या प्रयोजनार्थ, ज्या अधिकाऱ्याच्या सेवेची १५ वर्षे किमान सेवा पूर्ण होण्याकरिता ६ महिन्यांपेक्षा जास्त नसणारा कालावधी कमी पडत असेल त्या अधिकाऱ्यांच्या खास प्रकरणी शासन ३६ पेक्षा जास्त होणार नाही, अशा हप्त्यांमध्ये परतावायोग्य असलेले अग्रिम घेण्यास मुभा देऊ शकेल.

**टीप (५)**.---टीप क्र. ४ नुसार ज्या अधिकाऱ्याला अग्रिम घेण्यास मुभा दिली असेल, त्याला पंधरा वर्षांची सेवा पूर्ण झाल्यानंतर अग्रिमाची अदत्त शिल्लक अंतिमतः काढून घ्यावयाच्या रकमेत रुपांतरित करण्यास अनुमती देण्यात येईल.

**टीप (६)**.---नियम १६, खंड (ई), (फ) आणि (ग) अन्वये काढण्यात येणारी रक्कम फक्त एकाच प्रसंगासाठी काढता येईल.

**टीप (७).**—काढण्यात येणारी रक्कम ही, मोटारगाडी/मोटारसायकल/स्कूटर इ. च्या नोंदणीसाठी आवश्यक असलेल्या वाहनाच्या कारखानदाराने निश्चित केलेल्या रकमेपेक्षा जास्त नसेल.

**टीप (८).**—मोटारगाडीची मोठी दुरुस्ती किंवा संधारण (ओव्हर हॉलिंग) यासाठी काढण्यात येणाऱ्या रकमेची मर्यादा रु. ५,००० किंवा दुरुस्तीसाठी/संधारणासाठी लागणारी प्रत्यक्ष रक्कम, यापैकी जी कमी असेल, तेवढी असेल.

**टीप (९).**—ज्या मान्यताप्राप्त संस्था/शैक्षणिक पाठ्यक्रम यासाठी रकमा काढणे अनुज्ञेय आहे, त्यांची यादी परिशिष्ट ''ब'' मध्ये दिली आहे.

**टीप (१०).**—ज्या घराच्या बांधकामासाठी रक्कम काढून घेण्यात येईल त्या घराच्या बांधकामास ती रक्कम काढण्याच्या महिन्यापासून सहा महिन्यांच्या आत सुरुवात करण्यात येईल आणि बांधकाम सुरू केल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीत ते पूर्ण करण्यात येईल. बांधून तयार घराच्या खरेदीबाबतच्या प्रकरणात, घर आणि जागेसंबंधी निर्विवाद मालकी, रक्कम काढल्यापासून सहा महिन्यांच्या आत मिळवण्यात येईल.

**टीप (११).**—नियम १६, उपखंड (सहा) अन्वये घरासाठी जागेची खरेदी, संपूर्ण रक्कम किंवा यथास्थिती रकमेचा पहिला हप्ता घेतल्यानंतर तीन महिन्यांच्या आत करण्यात येईल.

**टीप (१२).**—उपरोक्तप्रमाणे काढून घेण्यात आलेल्या रकमेतून खरेदी करण्यात येणारे किंवा बांधण्यात येणारे नियोजित निवासस्थान किंवा सदनिका वर्गणीदार जेथे कामाला असेल त्या ठिकाणी किंवा त्याच्या निवृत्तीनंतर तो जेथे स्थायिक होऊ इच्छितो अशा ठिकाणी असेल.

**टीप (१३).**—रक्कम काढून घेण्याची अनुज्ञा फक्त घराच्या बांधणीसाठी, संपादनासाठी किंवा विमोचनासाठी देण्यात येईल आणि ती सुद्धा सरकारी कर्मचाऱ्याचे नियम १८ व्या पोट-नियम (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या ठिकाणी अगोदरच घर नसेल केवळ अशाच प्रकरणात देण्यात येईल.

**१९. प्राधिकारपत्र.**—रक्कम काढण्यास मंजुरी देण्यात आल्यानंतर, नियम २८, पोट-नियम (४), खंड (ब) अन्वये लेखा अधिकाऱ्याकडे अंतिम प्रदानासाठी अर्ज करण्यात आला असेल त्याबाबतीत लेखा अधिकाऱ्याच्या प्राधिकार पत्रावर रक्कम काढण्यात येईल.

**२०. रक्कम काढून घेण्यासाठी शर्ती.**—(१) नियम १६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या एका किंवा अधिक प्रयोजनासाठी कोणत्याही एका वेळी, वर्गणीदाराच्या खात्यात असलेल्या जमा निधीच्या अर्धी रक्कम किंवा सहा महिन्यांचे वेतन, यापैकी जी कमी असेल त्या रकमेपेक्षा अधिक रक्कम सर्वसाधारणपणे काढता येणार नाही. तथापि, मंजुरी देणारा प्राधिकारी, खालीलबाबी विचारात घेऊन त्याहून अधिक परंतु वर्गणीदाराच्या खाती जमा निधीच्या तीन चतुर्थांश एवढ्या मर्यादेपर्यंत रक्कम काढून घेण्यास मंजुरी देवू शकेल.

(अ) कोणत्या कारणांसाठी रक्कम काढण्यात येत आहे,

(ब) वर्गणीदाराचा दर्जा, आणि

(क) निधीमध्ये त्याच्या खाती जमा असलेली रक्कम.

(२) वर्गणीदाराने अल्प उत्पन्न गटासाठी असलेल्या गृहनिर्माण योजनेखाली अग्रिम सुविधा घेतली असेल अशा प्रकरणात किंवा मुंबई वित्तीय नियम, १९५९ च्या नियम १३४ आणि परिशिष्ट २६ मध्ये अंतर्भूत नियम या अन्वये घ्यावयाचे अग्रिम, नियम १६ च्या खंड 'ब' अन्वये घ्यावयाचे अग्रिम, त्या योजनेअन्वये किंवा त्या नियमान्वये विहित कमाल मर्यादेपेक्षा अधिक असणार नाही.

(३) नियम १६, खंड (अ), उपखंड (एक) अन्वये वर्गणीदारास वर्षातून एकदा निधीमधुन रक्कम काढता येईल.

(४) एखाद्या वर्गणीदारास एखादी जागा, किंवा घर किंवा सदनिका खरेदी करण्यासाठी किंवा सिडकोमार्फत किंवा महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकारणामार्फत अथवा एखाद्या सहकारी गृहनिर्माण संस्थेमार्फत किंवा प्रसिद्ध अशा खाजगी ठेकेदारामार्फत बांधण्यात आलेल्या घराकरिता अथवा सदनिकेकरिता कोणताही हप्ता भरावयाचा असेल अशा प्रकरणात, त्याला जेव्हा जेव्हा हप्ते भरण्यास सांगण्यात येईल त्या त्या वेळी, मंजूर रकमेच्या कमाल मर्यादेच्या अधीन राहून रक्कम काढण्याची परवानगी देण्यात येईल.

२१. **वर्गणीदाराकडून होणारा पैशाचा विनियोग.**—(१) नियम १६ अन्वये निधीमधून रक्कम काढून घेण्याची अनुज्ञा देण्यात आली आहे असा वर्गणीदार, याबाबत प्राधिकारी विनिर्दिष्ट करील अशा वाजवी मुदतीत, ज्या कारणासाठी ही रक्कम काढून घेण्यात आली त्यासाठीच ती वापरण्यात आली याबाबत मंजुरी अधिकाऱ्यांची खात्री पटवून देईल आणि त्याने जर असे करण्यात कसूर केली तर अशा रितीने काढून घेतलेली संपूर्ण रक्कम किंवा ज्या प्रयोजनाकरिता ही रक्कम काढून घेण्यात आली होती, त्यासाठी उपयोगात न आणलेला अशा रकमेचा भाग, वर्गणीदाराला ताबडतोब एकाच ठोक रकमेत निधीमध्ये परत करण्यात येईल आणि अशा प्रदानाबाबत त्याने कसूर केली तर, मंजुरी देणारा प्राधिकारी ही रक्कम एक रकमी किंवा तो निश्चित करील अशा मासिक हप्त्यांमध्ये वर्गणीदाराच्या वित्तलब्धीमधून वसूल करण्याचा आदेश देईल :

परंतु, या नियमान्वये काढून घेतलेल्या रकमेच्या परतफेडीची सक्तीने वसुली करण्यापूर्वी वर्गणीदाराला कळविण्यात आल्यापासून पंधरा दिवसाच्या आत, त्या रकमेची परतफेड करण्यास त्यास का भाग पाडण्यात येवू नये याबद्दल लेखी स्पष्टीकरण करण्याची त्यास संधी देण्यात येईल आणि मंजुरी प्राधिकाऱ्यांचे ह्या स्पष्टीकरणाने समाधान झाले नाही तर, किंवा वर्गणीदाराकडून पंधरा दिवसांच्या उक्त मुदतीत कोणतेही स्पष्टीकरण सादर करण्यात आले नाही तर मंजुरी अधिकारी या पोटनियमामध्ये विहित रीतीने परतफेड करण्यास त्याला भाग पाडेल.

(२) नियम १६, खंड ब, उपखंड (चार), (पाच) आणि (सहा) अन्वये ज्याला त्याच्या नावे निधीमध्ये जमा झालेल्या रकमेतून रक्कम काढण्याची परवानगी देण्यात आलेली असेल असा वर्गणीदार, त्याच्या ताब्यात असलेले त्यांने बांधलेले अथवा घेतलेले घर किंवा त्या पैशांनी खरेदी केलेली घराची जागा यांचा ताबा विक्रीद्वारे, गहाण ठेवून (राज्यपालाकडे गहाण ठेवण्यात येईल त्यांव्यतिरिक्त) देणगी देऊन, अदलाबदल करून किंवा अन्य कोणत्याही प्रकारे, मंजुरी प्राधिकरणाच्या पूर्वपरवानगी खेरीज सोडणार नाही.

२२. **पूर्व परवानगी केव्हा आवश्यक नाही.**—(१) नियम २१, पोट-नियम (२) अन्वये मंजुरी प्राधिकाऱ्यांच्या परवानगीची पुढीलप्रकरणी आवश्यकता राहणार नाही.

(अ) तीन वर्षापेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीकरिता घर किंवा घराची जागा भाडेपट्ट्याने देण्यात येईल तर, किंवा ;

(ब) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ अन्वये स्थापन केलेले मंडळ असणारे गृहनिर्माण मंडळ, नवीन घराच्या बांधकामासाठी किंवा विद्यमान घरात भर घालणारी अथवा फेरफार करणारी बांधकामे करण्यासाठी कर्ज देणारे, केंद्र किंवा राज्य सरकारच्या मालकीचे अथवा त्यांच्याकडून नियमित आयुर्विमा महामंडळ, राष्ट्रीयकृत बँका, गृहनिर्माण वित्त कंपन्या किंवा इतर कोणतेही महामंडळ यांच्याकडे, घर अथवा घराची जागा गहाण ठेवण्यात आलेली असेल तर, त्याकरिता.

(२) वर्गणीदार, घर अथवा प्रकरणपरत्वे घराची जागा त्याच्या ताब्यात अजूनही आहे की नाही अथवा ते घर अथवा जागा उपरोक्तप्रमाणे गहाण ठेवण्यात आली आहे अथवा हस्तांतरीत करण्यात आली आहे किंवा भाड्याने देण्यात आली आहे किंवा कसे, यासंबंधीचे प्रतिज्ञापन प्रत्येक वर्षी ३१ डिसेंबर पेक्षा उशिरा नसेल अशा वेळी सादर करील आणि त्याबाबतीत तो प्राधिकारी विनिर्दिष्ट करील अशा तारखेस किंवा त्यापूर्वी, त्या मालमत्तेवरील त्याचा हक्क ज्यावर आधारित असेल असे मूळ विक्रीचे कागदपत्र, गहाणखत किंवा भाडेपट्ट्यासंबंधीचे कागदपत्र सादर करण्यास त्या प्राधिकाऱ्याने सांगितले तर वर्गणीदार ते सादर करील.

(३) वर्गणीदाराने त्यांच्या सेवानिवृत्तीपूर्वी कोणत्याही वेळी मंजुरी प्राधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी न घेता घराचा किंवा घराच्या जागेचा कब्जा सोडला तर, त्याने अशाप्रकारे काढलेली रक्कम तो ताबडतोब निधीमध्ये एकरकमी भरील आणि अशी रक्कम भरण्यात त्याने कसूर केली तर मंजूरी प्राधिकारी त्या बाबीसंबंधी त्याला अभिवेदन करण्याची वाजवी संधी देऊन उक्त रक्कम वर्गणीदाराच्या वित्तलब्धीमधून एका रकनेत अथवा मंजुरी प्राधिकारी निर्धारीत करील इतक्या मासिक हप्त्यांत वसूल करील.

(४) वर्गणीदाराला, एकाच प्रयोजनाकरिता, अग्रिम किंवा अंतिमरित्या पैसे काढणे एकाच वेळी मंजूर करण्यात येणार नाही.

(५) नियम १६, पोट-नियम (ब), खंड (चार), (पाच) आणि (सहा) मध्ये विनिर्दिष्ट प्रयोजनाकरिता, भविष्य निर्वाह निधीतून अंतिमरित्या पैसे काढण्यास मंजुरी दिली असेल तेव्हा, मंजुरी प्राधिकारी मंजुरी आदेशामध्ये पुढील गोष्टी दर्शवील :—

(अ) अंतिमरित्या पैसे काढण्यास मंजुरी प्रदान करण्याच्या वेळी वर्गणीदाराचे वेतन.

(ब) राज्य शासनाच्या घर बांधणी अग्रिम नियमान्वये घर बांधण्याकरिता त्याने घेतलेल्या अग्रिमाचा तपशील व अग्रिमाची रक्कम.

(क) कोणत्याही अन्य शासकीय मार्गाने यासंबंधात त्याने प्राप्त केलेले इतर सहाय्य.

**२३. निवृत्तीपूर्वी रक्कम काढणे.**—वर्गणीदाराला, निधीमध्ये त्याच्या खात्यावर जमा असलेल्या रकमेच्या ९० % पेक्षा अधिक असणार नाही एवढी रक्कम, वर्गणीदाराच्या नियत सेवानिवृत्तीच्या तारखेपूर्वी १२ महिन्यामध्ये, कोणतेही कारण नमूद न करता काढण्यास परवानगी देण्यात येईल.

**२४. अग्रिमाचे अंतिमरित्या काढून घ्यावयाच्या रकमेत रुपांतर.**—(१) नियम १६ मध्ये विनिर्दिष्ट प्रयोजनाकरिता, नियम १३ अन्वये ज्याने यापूर्वीच अग्रिम रक्कम घेतली आहे त्या वर्गणीदारास त्यांची इच्छा असल्यास, मंजुरी अधिकाऱ्यामार्फत लेखा अधिकाऱ्याला लेखी विनंती करून शिल्लक अग्रिम रकमेचे अंतिमरित्या काढावयाच्या रकमेत रुपांतर करता येईल.

(२) नियम १६ मध्ये दिलेल्या शर्ती पूर्ण केल्याची खात्री झाल्यानंतर अग्रिमाचे अंतिमरित्या काढून घ्यावयाच्या रकमेत रुपांतर करण्याची वर्गणीदाराची विनंती मंजुरी प्राधिकारी, विचारात घेईल.

**टीप.**—असे रुपांतर करण्यासाठी अर्ज स्वीकारला आणि तो लेखा अधिकाऱ्यांकडे पाठवला की मंजुरी प्राधिकारी, आहरण व संवितरण अधिकाऱ्याला, वेतन बिलातून करण्यात येणारी वसुली बंद करण्यास सांगतील.

**२५. निधीतील जमा अंतिमरित्या काढून घेणे.**—(१) जेव्हा वर्गणीदार नोकरी सोडून जाईल तेव्हा त्याच्या खाती निधीमध्ये जमा असलेली रक्कम त्याला देय होईल :

**परंतु**, सेवेतून बडतर्फ करण्यात आलेल्या वर्गणीदाराला पुन्हा सेवेत घेण्यात आले तर, शासनाने तसे करायला फर्मावल्यास वर्गणीदाराला या नियमाच्या तरतुदीनुसार निधीमधून देण्यात आलेली रक्कम, तो नियम २६ मध्ये नमूद केलेल्या दराने त्यावरील व्याजासहित परत करेल. अशी परत करण्यात आलेली रक्कम निधीमध्ये त्याच्या खात्यात जमा करण्यात येईल.

**स्पष्टीकरण एक.**—करारावर नियुक्त करण्यात आलेला किंवा सेवेतून मुक्त होऊन नंतर सेवेत खंड धरून किवा न धरता पुन्हा नियुक्त करण्यात आलेला वर्गणीदार खेरीज करून इतर वर्गणीदार जेव्हा आधीच्या पदाशी काहीही संबंध न ठेवता इतर राज्य शासनाच्या किंवा केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या दुसऱ्या विभागातील नवीन पदावर (जे पद भविष्य निर्वाह निधीच्या वेगळ्या नियमांद्वारे नियंत्रित केले जाते) त्याची बदली करण्यात आली तर तो सेवा सोडून गेला असे मानण्यात येणार नाही. अशा प्रकरणात त्यांची वर्गणी त्यावरील व्याजासह पुढीलप्रमाणे हस्तांतरीत करण्यात येईल.—

(अ) जर नवीन पद राज्य शासनाच्या अन्य विभागात असेल तर, तेथील भविष्य निर्वाह निधीच्या नियमांनुसार त्या निधीतील त्या त्याखात्यावर, किंवा

(ब) जर नवीन पद दुसऱ्या राज्य शासनाच्या किंवा केंद्र शासनाच्या अधिकारात असेल तर संबधित राज्य शासनाच्या किंवा केंद्र शासनाच्या अधिकारातील नवीन खात्यात असे राज्य शासन किंवा केंद्र शासन सर्वसामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे संमती देईल त्याप्रमाणे.

**स्पष्टीकरण दोन.**—तात्पुरते पद धारण करणाऱ्या वर्गणीदारास त्याच्या सेवासमाप्तीनंतर निधीतील त्याच्या खाती असलेली रक्कम एकतर काढून घेता येईल किंवा तो अंतिमरित्या नोकरी सोडून जाईपर्यंत आपल्या खात्यात ठेवता येईल.

**स्पष्टीकरण तीन.**—बदली या संज्ञेत, राज्य शासनाच्या इतर विभागात किंवा केंद्र शासनाकडे नियुक्ती स्वीकारण्याकरिता सेवेत कोणताही खंड न पडता आणि यथोचितरित्या अधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीने दिलेल्या राजीनामाच्या प्रकरणाचाही समावेश केला जाईल. सेवेत खंड असणाऱ्या प्रकरणांत, असा खंड दुसऱ्या गावी बदली झाल्यावर मिळणाऱ्या पदग्रहण अवधी इतकाच मर्यादित असला पाहिजे. नोकर कपातीच्या प्रकरणात सुद्धा जर त्यापाठोपाठ त्याच किंवा इतर राज्य शासनाखाली तात्काळ नोकरी मिळाली असेल तर हाच नियम लागू होईल.

(२) करारावर नियुक्त केलेल्या किंवा सेवेतून निवृत झाल्यानंतर पुन्हा कामावर घेतलेल्या वर्गणीदाराखेरीज इतर वर्गणीदार जेव्हा सेवेत खंड न पडता शासनाच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखाली असलेल्या एखाद्या महामंडळामध्ये किवा संस्था नोंदणी अधिनियम, १८६० खाली नोंदणी केलेल्या स्वायत्त संघटनामध्ये नोकरीकरिता सेवेत खंड न पडता वर्गणीदाराची बदली होईल तेव्हा वर्गणीची रक्कम व तिच्यावरील व्याज त्याला देण्यात येणार नाही, ते त्या संस्थेच्या संमतीने त्या संस्थेच्या नियंत्रणाखालील नवीन भविष्य निर्वाह निधीच्या खात्यात हस्तांतरीत केले जाईल. "बदली" या संज्ञेत शासनाची संस्था किंवा शासनाच्या मालकीची अथवा शासन नियंत्रित कंपनी किंवा संस्था नोंदणी अधिनियम, १८६० खाली नोंदलेली स्वायत्त संघटना यांच्याकडील नियुक्ती, कोणताही खंड पडू न देता आणि सक्षम प्राधिकाऱ्यांच्या रीतसर परवानगीने ते स्वीकारण्यासाठी सेवेचा राजीनामा देण्याची प्रकरणे समाविष्ट होतील. एका पदावरून दुसऱ्या पदांवर स्थानांतरण स्वीकारतांना लागणारा कालावधी हा शासकीय कर्मचाऱ्यांना एक पद सोडून दुसरे पद स्वीकारताना लागणाऱ्या पदग्रहण अवधीपेक्षा अधिक नसेल तर तो सेवेतील खंड असल्याचे मानले जाणार नाही :

परंतु एखाद्या सार्वजनिक उपक्रमाची सेवा स्वीकारण्याची निवड वर्गणीदाराने आपल्या विकल्पानुसार केली असेल तर वर्गणीची व्याजासह असलेली रक्कम त्या उपक्रमातील त्याच्या नवीन भविष्य निर्वाह निधी लेख्यामध्ये बदली करण्याची त्यांची इच्छा असेल आणि त्या संबंधित उपक्रमानेही अशा बदलास संमती दिली तर, त्या नवीन भविष्य निर्वाह निधी लेख्यामध्ये ती बदली करण्यात येईल. तथापि वर्गणीदाराची अशा प्रकारच्या हस्तांतरणाची इच्छा नसेल किंवा संबंधित उपक्रमामध्ये भविष्य निर्वाह निधी कार्यान्वित नसेल तर, उपरोक्त रक्कम वर्गणीदारास परत करण्यात येईल.

**टीप** (१).–शासनाला देय रकमाची वसुली आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीचे अंतिम प्रदान यांची सरमिसळ करू नये.

**टीप** (२).–भविष्य निर्वाह निधीच्या जमा रकमातून वजा करण्याबाबत भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९२५ च्या कलम ३, पोट-कलम (१) मध्ये तरतूद केलेली सूट नामनिर्देशित व्यक्तीने ओढवून घेतलेल्या दायित्वाच्या संबंधात लागू होणार नाही.

**टीप** (३).–शासकीय कर्मचाऱ्याने अफरातफर केलेली रक्कम त्यांच्या सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीतून वळती करण्यात येऊ नये.

**टीप** (४).–बदली या संज्ञेत, राज्य शासनाच्या रीतसर परवानगीने केंद्र सरकार किंवा इतर राज्य शासनाच्या सेवेत किंवा त्याच राज्य शासनाच्या इतर विभागात (जेथे वर्गणीदारास भविष्य निर्वाह निधीचे इतर नियम लागू असतील) असणारी नियुक्ती सेवेत खंड न पडता स्वीकारण्यासाठी, दिलेल्या राजीनाम्याच्या प्रकरणांचाही समावेश होतो, असे मानले जावे. सेवेत नाममात्र खंड असणाऱ्या प्रकरणांत असा खंड दुसऱ्या गावी बदली झाल्यावर मिळणाऱ्या पदग्रहण अवधीइतकाच काटेकोरपणे मर्यादित असला पाहिजे. नोकर कपातीच्या प्रकरणात सुद्धा, पाठोपाठ तात्काळ पुन्हा नोकरी मिळाली असेल तर हाच नियम लागू होईल, मग ती नोकरी त्याच शासनाची असो किंवा वेगळ्या शासनाची असो.

२६. **वर्गणीदाराची सेवानिवृत्ती.**–जेव्हा वर्गणीदार (अ) निवृत्तीपूर्व रजेवर गेला असेल किंवा दीर्घ कालावधीची सुट्टी मिळणाऱ्या विभागामध्ये नोकरीस असेल आणि त्याने निवृत्तीपूर्व रजा आणि सुट्टी एकत्रित घेतली असेल तेव्हा, किंवा

(ब) रजेवर असताना त्याला निवृत्त होण्याची परवानगी देण्यात आली असेल किंवा सक्षम वैद्यकीय प्राधिकाऱ्याने त्यास आणखी सेवेसाठी अयोग्य ठरवले असेल तेव्हा, निधीमध्ये त्याच्या खात्यात जमा असलेली रक्कम त्याबाबतीत वर्गणीदाराने लेखा अधिकाऱ्यांकडे अर्ज केल्यानंतर त्याला परत करण्यात येईल. परंतु जर वर्गणीदार पुनः सेवेत रूजू झाला तर शासनाने अन्यथा निर्णय घेतला असेल ते खेरीज करून, या नियमानुसार निधीतून त्याला देण्यात आलेली रक्कम, नियम १२ मध्ये तरतूद केल्यानुसार त्यावरील व्याजासह, रोख रकमेत किंवा रोख्यांमध्ये किंवा अंशतः रोख्यांमध्ये, हप्त्याहप्त्याने किंवा इतर प्रकारे, त्याच्या वित्तलब्धीमधून किंवा अन्यथा, नियम १३, पोट-नियम (२) खाली विशेष कारणासाठी अग्रिम मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी निर्देशित करील त्याप्रमाणे, वर्गणीदाराला निधीत त्याच्या खात्यावर जमा करावी लागेल.

**टीप** (१).–भविष्य निर्वाह निधीचे अंतिम प्रदान करण्याकरिता "ना मागणी प्रमाणपत्र" सादर करणे आवश्यक आहे, परंतु पुढील प्रकरणे यातून वगळली आहेत.–

(१) वर्गणीदाराच्या मृत्युनंतर, भविष्य निर्वाह निधीतील जमा रक्कम अशा अवलंबिताकडे विहीत असेल की, जे अवलंबितांनी वर्गणीदाराच्या मृत्यूनंतर काढलेल्या कर्जाकरिता जप्ती होण्याकरिता पात्र आहेत आणि अशी कर्जे ज्यांच्याकडून जमा रक्कम देय आहे अशा शासनाला देय असतील तेव्हा ते दोन पक्षातील दावे प्रतिदाव्यांच्या वजावटी संबंधीच्या सामान्य कायद्यान्वये जमा रकमेतून वळते करता येतील.

(२) भविष्य निर्वाह निधीतील रकमेकरिता हक्कदार असलेल्या परंतु अवलंबून नसलेल्या व्यक्ती.

(३) वर्गणीदाराची विधवा पत्नी किंवा मुले यांच्या व्यतिरिक्त अवलंबित व्यक्ती, भविष्य निर्वाह निधीतील पैशाचे प्रदान, भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९२५ च्या प्रारंभापूर्वी केलेले कोणतेही अभिहस्तांकन किंवा भार याच्या अधिन असेल त्याबाबतीत.

२७. **वर्गणीदार मृत्यू पावल्यानंतरची कार्यपद्धती.**---वर्गणीदाराच्या खात्यावर असलेली जमा रक्कम देय होण्यापूर्वी किंवा रक्कम देय झाल्यानंतर ती प्रदान करण्यापूर्वी वर्गणीदार मृत्यू पावल्यास, वर्गणीदारामागे त्याचे कुटुंब असेल, त्यावेळी

(१) जर वर्गणीदाराने नियम ५ च्या तरतुदींनुसार त्याच्या कुटुंबातील व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या नावे नामनिर्देशन केले असेल तर निधीमधील त्याच्या खात्यावरील रक्कम किंवा नामनिर्देशनात नमूद केलेली अंशतः रक्कम नामनिर्देशित व्यक्तीला किंवा व्यक्तींना, नामनिर्देशनात विनिर्दिष्ट केलेल्या प्रमाणात दिली जाईल.

(२) वर्गणीदाराच्या वर्गणीचे असे कोणतेही नामनिर्देशन कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या नावे करण्यात आले नसेल किंवा असे नामनिर्देशन त्याच्या निधीवरील खात्यातील रकमेच्या काही भागापुरतेच मर्यादित असेल तर, प्रकरणपरत्वे, संपूर्ण रक्कम किंवा नामनिर्देशनाशी संबंधित नसेल असा तिचा भाग, कुटुंबातील व्यक्तीशिवाय इतर कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या नावे एखादे नामनिर्देशन केलेले असले तरीही कुटुंबातील व्यक्तींना सम प्रमाणात देय होईल :

परंतु, पुढील खंड (१), (२), (३) व (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तींव्यतिरिक्त अन्य व्यक्ती कुटुंबात असतील तर.---

(१) कायदेशीरदृष्ट्या सज्ञान झालेले मुलगे,

(२) मयत मुलांचे कायदेशीरदृष्ट्या सज्ञान झालेले मुलगे,

(३) ज्यांचे पती हयात आहेत अशा विवाहित मुली,

(४) मयत मुलाच्या ज्यांचे पती हयात आहेत अशा, विवाहित मुली.

यांना ह्यातील कोणताही हिस्सा देय होणार नाही. परंतु मृत मुलाची विधवा किंवा विधवांना आणि मूल किंवा मुलें यांना जर तो मुलगा वर्गणीदाराच्या मागे हयात राहिला असता व उपरोक्त परंतुकाच्या खंड (१) च्या तरतुदींमधून त्याला सूट दिली असती तर त्याला जो हिस्सा मिळाला असता त्याचे भाग त्यांना समप्रमाणात मिळतील.

(२) वर्गणीदाराचे जेव्हा कोणतेही कुटुंब नसेल तेव्हा जर त्याने नियम ५ च्या तरतुदीनुसार कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या संस्थेच्या नावे केलेले नामनिर्देशित अस्तित्वात असेल तर निधीतील त्याच्या खात्यात असलेली जमा रक्कम किंवा तिचा भाग ज्याच्याशी नामनिर्देशन संबंधित असेल ह्या नामनिर्देशित व्यक्तीला किंवा व्यक्तींना नामनिर्देशनात विनिर्दिष्ट केलेल्या प्रमाणात देय होईल.

**टीप (१).**---भविष्य निर्वाह निधीच्या रकमेचे प्रदान, देय रक्कम रुपये दहा हजारांपेक्षा अधिक असल्यास, अशी रक्कम त्याच्या/त्यांच्या स्वाभाविक पालकाला प्रदान करण्यात येईल. स्वाभाविक पालक अस्तित्वात नसेल तर अज्ञान व्यक्तीच्या वतीने रक्कम प्राप्त करण्यास कार्यालय प्रमुखास योग्य वाटेल अशा व्यक्तीला, त्याने द्यावयाच्या रकमेचे शासनाला क्षतिपूरण करण्याचे मान्य करणाऱ्या दोन जामीनदारांनी स्वाक्षरीत केलेले बंधपत्र केल्यानंतर रक्कम प्रदान करण्यात येईल.

उक्त व्यक्तीला तो अज्ञान मुलाच्या मालमत्तेचा प्रभारी असून तिची देखभाल करीत आहे किंवा जर अज्ञान मुलाची भविष्य निर्वाह निधीच्या रकमेखेरीज अन्य मालमत्ता नसेल तर, अज्ञान मूल तिच्या अभिरक्षेमध्ये आणि देखरेखीखाली आहे अशा आशयाचेसुद्धा शपथपत्र सादर करण्यास सांगता येईल.

**टीप (२)**.—अज्ञान मुलाला देय रक्कम रुपये दहा हजारापेक्षा कमी असेल तर अशा रकमेच्या संबंधात क्षतिपूर्ती बंधपत्र आवश्यक नसेल. भविष्य निर्वाह निधीच्या रकमेखेरीज अन्य मालमत्ता असेल तर, अज्ञान मूल तिच्या अभिरक्षेत आणि देखरेखीखाली आहे, असे शपथपत्र क्षतीपूर्ती बंधपत्रासह सादर करावे लागेल.

**टीप (३)**.—हिंदु विधवा/विधुर हे अज्ञान मुलाचे स्वाभाविक पालक आहेत. त्याच्या/तिच्या अज्ञान मुलाच्या वतीने भविष्य निर्वाह निधीच्या रकमेचे प्रदान त्याला/तिला, अंतर्भूत रक्कम कितीही असली तरी विधवा/विधुर यांचे हितसंबंध अज्ञान मुलांच्या हितसंबंधाशी प्रतिकूल आहेत असे मानण्यास निश्चित असे काही कारण नसेल तर, पालकत्व प्रमाणपत्र किंवा क्षतिपूर्ति बंधपत्र सादर न करता, करण्यात येईल.

**टीप (४)**.—सावत्र आई/सावत्र वडील हे अज्ञान सावत्र मुलगा/सावत्र मुलगी हिचे स्वाभाविक पालक नव्हेत.

**टीप (५)**.—वर्गणीदार त्याच्या कुटुंबातून जेव्हा बेपत्ता होतो तेव्हा सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीची पूर्ण रक्कम, त्याने त्यासंबंधात केलेल्या नामनिर्देशनानुसार, त्याच्या कुटुंबाला पुढील अटीच्या अधीन राहून प्रदान करण्यात येईल.—

(१) पोलीसांनी सर्वप्रकारचे प्रयत्न केल्यावर देखील कर्मचाऱ्याचा शोध लागलेला नाही अशा आशयाचा संबंधित पोलीस ठाण्याचा अहवाल, त्याच्या कुटुंबाने सादर केला पाहिजे.

(२) कर्मचाऱ्याच्या नामनिर्देशित व्यक्तीने/अवलंबितांनी असे क्षतिपूर्ती बंधपत्र सादर केले पाहिजे की, कर्मचारी उपस्थित झाला व त्याने कोणताही दावा केला तर कर्मचाऱ्याला देय असलेल्या सर्व रकमा प्रदानाच्या रकमामधून, समायोजित करण्यात येतील.

२८. **निधीतील रक्कम प्रदान करण्याची रीत**.—(१) निधीमध्ये वर्गणीदाराच्या खात्यावर जमा असलेली रक्कम देय होईल तेव्हा पोट-नियम (४) मध्ये तरतूद केल्यानुसार, त्यासंबंधात लेखी अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्याचे प्रदान करणे हे लेखा अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल.

(२) या नियमाखाली कोणतीही रक्कम द्यावयाची असेल ती व्यक्ती वेडी असेल आणि अशा व्यक्तीच्या इस्टेटीसाठी भारतीय वेड्याबाबतचा अधिनियम, १९१२ अन्वये व्यवस्थापकाची नेमणूक केली असेल अशा बाबतीत व्यवस्थापकास अशी रक्कम प्रदान करण्यात येईल, वेड्या व्यक्तीस ती रक्कम देण्यात येणार नाही :

परंतु कोणताही व्यवस्थापक नेमण्यास आला नसेल व ज्या व्यक्तीला रक्कम देय असेल ती व्यक्ती वेडी असल्याचे दंडाधिकाऱ्याने प्रमाणित केले असेल तर, देय असलेली रक्कम भारतीय वेड्याबाबतचा अधिनियम, १९१२ याच्या कलम ९५, पोट-कलम १ च्या तरतुदीनुसार जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशान्वये अशा वेड्या व्यक्तीचा ताबा जिच्याकडे असेल त्या व्यक्तीस देण्यात येईल व लेखा अधिकारी अशा वेड्या व्यक्तीचा ताबा जिच्याकडे असेल त्या व्यक्तीस त्याला योग्य वाटेल अशी रक्कम फक्त देईल आणि जर कोणतीही रक्कम शिल्लक राहिली तर ती किंवा तिचा कोणताही भाग, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे वेड्या व्यक्तीच्या कुटुंबातील व्यक्तीपैकी निर्वाहासाठी त्याच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तींच्या निर्वाहासाठी देईल.

(३) काढलेल्या रकमेचे प्रदान केवळ भारतातच करण्यात येईल. रकमा ज्या व्यक्तींना देय असतील त्या व्यक्ती, भारतात रकमा स्वीकारण्याची व्यवस्था स्वतःच करतील.

(४) पोट-नियम (१) अन्वये वर्गणीदाराला रक्कम प्रदान करणे लेखा अधिकाऱ्यास शक्य व्हावे याकरिता वर्गणीदार रकमेची मागणी करतांना पुढील पद्धती अनुसरील.—

(अ) वर्गणीदारास निधीची रक्कम काढण्याकरिता अर्ज सादर करणे शक्य व्हावे म्हणून, कार्यालय प्रमुख प्रत्येक वर्गणीदारास त्याचे नियत वयमान होण्याच्या तारखेपूर्वी एक वर्ष अगोदर किंवा त्याची अपेक्षित सेवानिवृत्ती अगोदरची

असेल तर त्यापूर्वी, आवश्यक ते नमुने, " वर्गणीदारास प्राप्त झाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या कालावधीत यथोचितरित्या भरून त्याच्याकडे परत पाठवावेत " अशा अर्थाच्या सूचना देऊन पाठवील. वर्गणीदार तो अर्ज निधीची रक्कम काढण्याकरिता कार्यालय प्रमुखामार्फत अथवा विभाग प्रमुखामार्फत लेखा अधिकाऱ्यांकडे सादर करील असा अर्ज.—

(एक) वर्गणीदाराच्या नियत वयोमानाच्या तारखेच्या अथवा त्याच्या अपेक्षित सेवानिवृत्तीच्या तारखेच्या एक वर्ष अगोदर संपणाऱ्या वर्षाच्या लेखा विवरणामध्ये त्याच्या खात्यावर जमा असलेल्या रकमेसाठी, किंवा

(दोन) लेखा विवरण वर्गणीदारास मिळालेले नसेल तर खातेवहीत त्याच्या खात्यामध्ये विनिर्दिष्ट रकमेसाठी करण्यात येईल.

(ब) कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख हा अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्यापासून पंधरा दिवसाच्या मुदतीत, अग्रिमाच्या अजूनही वसूल करण्याचे चालू असेलेल्या रकमा आणि राहिलेल्या हप्त्यांची संख्या याचा निर्देश करून लेखा अधिकाऱ्यांकडे पाठवील. लेखा अधिकाऱ्याकडून पाठविण्यात आलेल्या वर्गणीदाराच्या लेखाच्या अंतिम विवरणपत्रातील कालावधीनंतर वर्गणीदाराने कोणत्याही रकमा काढून घेतल्या असल्यास, त्या काढून घेतलेल्या रकमांचाही न चुकता, लेखा अधिकाऱ्यास निर्देश करील.

(क) लेखा अधिकारी, खातेवहीशीं पडताळणी केल्यानंतर, प्रदान करणे अनुज्ञेय असल्याचे दिसून आलेल्या रकमेकरिता, नियत सेवावधीच्या कमीत कमी एक महिना अगोदर परंतु नियत सेवावधीच्या दिनांकास त्यास रक्कम मिळेल अशा बेताने प्राधिकारपत्र काढील.

(ड) खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट प्राधिकारपत्र प्रदान करावयाच्या रकमेचा पहिला हप्ता निश्चित करील. प्रदानाकरिता दुसरे प्राधिकारपत्र नियत सेवावधीच्या नंतर शक्य तितक्या लवकर काढले जाईल. दुसरे प्राधिकारपत्र वर्गणीदाराने खंड (अ) अन्वये सादर केलेल्या अर्जात उल्लेखिलेल्या रकमेनंतर दिलेली वर्गणी, अधिक पहिल्या अर्जाच्या वेळेस अग्रिमाचे जे हप्ते चालू होते त्यांच्या परताव्याशी संबंधित असेल.

(इ) लेखा अधिकाऱ्यांकडे अंतिम रक्कम मिळण्यासाठी अर्ज अग्रेषित केल्यानंतर आगाऊ रक्कम/काढावयाची रक्कम मंजूर करता येईल. परंतु आगाऊ रक्कम/काढावयाची रक्कम, संबंधित लेखा अधिकाऱ्याने प्राधिकृत केल्यानंतर काढण्यात येईल. लेखा अधिकारी अशी व्यवस्था, मंजूरी प्राधिकाऱ्याची रीतसर मंजूरी मिळाल्यानंतर ताबडतोब करील.

**टीप**.—(१) जेव्हा वर्गणीदाराच्या खात्यावर जमा असलेली रक्कम नियम २५, २६ आणि २७ अन्वये देय होईल तेव्हा, पोट-नियम (४), (२) मध्ये विनिर्दिष्ट पद्धतीनुसार लेखा अधिकारी ताबडतोब प्रदान होण्यासाठी प्राधिकारपत्र काढील. आणि प्रदानातील विलंब दूर किंवा कमी करण्यासाठी कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुखाने पुढील उपाययोजना कराव्यात.—

(अ) वर्गणीदाराचा सेवेत असताना मृत्यू झाल्यास, वर्गणीदाराच्या मृत्यूबाबतची सूचना, भविष्य निर्वाह निधीचा हिशेब पूर्ण करण्याच्या दृष्टीने करणे शक्य व्हावे म्हणून लेखा अधिकाऱ्याला त्वरीत देण्यात यावी. मयत वर्गणीदाराच्या नामनिर्देशन इत्यादीचा तपशील सुद्धा लेखा अधिकाऱ्यास कळवण्यात येईल.

(ब) भविष्य निर्वाह निधीच्या रकमेचे अंतिम प्रदान करण्याकरिता नामनिर्देशित व्यक्तीकडून/वर्गणीदाराच्या कुटुंबातील व्यक्तीकडून लेखा अधिकाऱ्याला द्यावयाचा अर्ज घेण्याची कार्यवाही देखील सुरू करावी. कायदेशीर वारस त्यासाठी काही करील याची वाट पाहू नये.

**२९. भविष्य निर्वाह निधीच्या रकमेचे प्रदान प्राधिकृत करण्याकरिता कार्यपद्धती.**—(१) नियत सेवावधीच्या दिनांकानंतर लगेचच येणाऱ्या दिनांकास, सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीतील जमा रकमेचे प्रदान करण्याकरिता प्राधिकार देण्यासाठी पुढील कार्यपद्धतीचा अवलंब केला जाईल.—

(एक) नियत सेवावधीनंतर सेवानिवृत्त होणाऱ्या वर्गणीदाराला नियम २८(४) नुसार, त्याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपूर्वी एक वर्ष अगोदर अर्ज करण्यास सांगण्यात यावे.

(दोन) वर्गणीदार, निधीच्या अंतिम वजात केल्यानंतर आणि निधीमध्ये वर्गणी देण्यापासून सूट अंमलात आल्यानंतर लगेचच, दुसरा अर्ज त्याने दिलेल्या वर्गणीचे आणि वरील (एक) मध्ये उल्लेख केलेल्या अर्जात समाविष्ट नसलेल्या मुदतीत त्याने अग्रिमापोटी काही हप्ते भरले असतील तर त्या हप्त्यांच्या परताव्याचे प्रदान मिळावे यासाठी करील.

(तीन) लेखा अधिकारी, वर्गणीदाराचे नियत वयमान पूर्ण होईल त्या दिनांकापासून एक वर्ष आधी वर्गणीदाराने केलेल्या रकमेच्या अंतिम प्रदानाचा पहिला अर्ज मिळाल्यानंतर खातेवहीची त्या दिवसापर्यंतची पडताळणी करील आणि दुसरा अर्ज प्राप्त झाल्यानंतर खातेवहीतील उरलेल्या नऊ महिन्यांच्या हिशोबाची पडताळणी करील आणि त्याच्या नियत सेवावधीच्या तारखेच्या कमीत कमी एक महिना अगोदर प्रदान प्राधिकृत करील. तथापि, वर्गणीदाराच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकानंतरच्या दिनांकास रक्कम देय होईल.

(२) पहिला अर्ज प्राप्त झाल्यानंतर, लेखा अधिकारी, कोणत्याही रकमा गहाळ असल्यास, त्या शोधून काढणे आणि समायोजन करणे, यासह भविष्य निर्वाह निधी लेखा पूर्ण आणि सर्व बाबतीत अद्ययावत आहे याची खात्री करून घेण्याकरिता सर्व कार्यवाही पूर्ण करील.

**टीप** (१).–वर्गणीदार नियत सेवावधीनंतर सेवानिवृत्त होताना त्याच्या सेवेच्या अंतिम तीन महिन्यांच्या कालावधीत निधीमध्ये कोणतीही वर्गणी देण्यापासून त्याला सूट देण्यात येईल. त्याची वर्गणी बंद करणे अनिर्वाय आहे.

**टीप** (२).–उपरोक्त (१) मध्ये काहीही नमूद केलेले असले तरीही, ठेव संलग्न विमा योजनेच्या प्रयोजनाकरिता, त्याच्या सेवेच्या अंतिम तीन महिन्यात वर्गणीची वसुली बंद झाली असली तरी वर्गणीदारास त्याच्या सेवानिवृत्तीपर्यंत वर्गणीदार म्हणूनच मानण्यात येईल.

**३०. ठेव संलग्न विमा योजना.**–वर्गणीदाराच्या मृत्यूनंतर, वर्गणीदाराच्या खाती जमा असलेली रक्कम मिळण्याचा हक्क असलेल्या व्यक्तीस, लेखा अधिकारी, पुढील शर्तीस अधीन राहून, अशा वर्गणीदाराच्या मृत्यूच्या लगतपूर्वीच्या तीन वर्षामध्ये त्याच्या खाती शिल्लक असलेल्या सरासरी वर्गणीच्या रकमेएवढी अतिरिक्त रक्कम मिळण्यास प्राधिकृत करील. त्या शर्ती अशा.–

(अ) अशा वर्गणीदाराच्या खाती जमा असलेली वर्गणीची रक्कम, त्याच्या मृत्यूच्या निकटपूर्वीच्या तीन वर्षामध्ये कोणत्याही वेळी पुढील मर्यादेपेक्षा कमी असता कामा नये. त्या मर्यादा अशा.–

(एक) वेतनश्रेणीचा कमाल रु. ४,००० किंवा अधिक असलेले पद, उपरोक्त तीन वर्षांच्या कालावधीपैकी जास्तीच्या अवधीकरिता ज्याने धारण केले अशा व्यक्तीच्या प्रकरणात रु. १२,००० ;

(दोन) वेतनश्रेणीचा कमाल टप्पा रु. २,९०० किंवा त्यापेक्षा अधिक, परंतु रु. ४,००० पेक्षा कमी असलेले पद, उपरोक्त तीन वर्षांच्या कालावधीपैकी जास्तीच्या अवधीकरिता ज्याने धारण केले अशा व्यक्तीच्या प्रकरणात रु. ७,५०० ;

(तीन) वेतनश्रेणीचा कमाल टप्पा रु. १,१५१ किंवा अधिक, परंतु रु. २,९०० पेक्षा कमी असलेले पद उपरोक्त तीन वर्षांच्या कालावधीपैकी अधिकांश अवधीकरिता ज्याने धारण केले आहे अशा वर्गणीदाराच्या प्रकरणात रु. ४,५०० ;

(चार) वेतनश्रेणीचा कमाल टप्पा रु. १,१५१ पेक्षा कमी असलेले पद व उपरोक्त तीन वर्षांच्या कालावधीसाठी जास्तीच्या अवधीकरिता ज्याने धारण केले आहे अशा वर्गणीदाराच्या प्रकरणात रु. ३,००० ;

परंतु अशा वर्गणीदाराचा मृत्यू १-४-१९७८ पूर्वी झाला असेल तर त्याला या खंडातील काहीही लागू होणार नाही.

(ब) या नियमान्वये देय अतिरिक्त रक्कम रु. ३०,००० पेक्षा अधिक असणार नाही.

(क) वर्गणीदाराने मृत्यूच्या वेळेपर्यंत किमान पाच वर्षांची सेवा केलेली असली पाहिजे.

(२) शासकीय कर्मचारी, त्याच्या मृत्यूच्या वेळी, ज्याच्या अधिपत्याखाली नोकरी करीत होता त्या कार्यालयाचा प्रमुख, लेखा अधिकाऱ्याकडून (वर्ग चारच्या प्रकरणात कार्यालय प्रमुखाकडून आणि अर्थसंकल्पीय अनुदानाच्या संबंधात, विभाग प्रमुखाकडून) रकमेच्या अनुज्ञयतेची खात्री करून घेतल्यानंतर, पोट-कलम (१) अन्वये देय रकमेचे प्रदान करील.

(३) वर्गणीदाराने त्याच्या मृत्यूच्या लगतपूर्वीच्या ३६ महिन्यांच्या कालावधीत निरनिराळ्या वेतनश्रेणीची पदे धारण केली असतील तर मयत वर्गणीदाराने शेवटच्या तीन वर्षात जास्तीत जास्त काळ जे पद धारण केले असेल त्या वेतनश्रेणीशी संबंधित किमान जमा रक्कम हीच याबाबतीत समुचित किमान अर्हताकारी जमा रक्कम होय.

**टीप (१).**–ज्या महिन्यात मृत्यू झाला असेल त्या महिन्याच्या लगतपूर्व ३६ महिन्यांच्या शेवटी वर्गणीदाराच्या खात्यावर शिल्लक रकमेच्या आधारावर सरासरी शिल्लक काढण्यात येईल. या प्रयोजनाकरिता तसेच उपरोक्त विहित किमान शिल्लक यांच्या तपासणीखाली–

(अ) मार्च अखेरच्या शिल्लक रकमेत, नियम १२ नुसार, जमा केलेले वार्षिक व्याज समाविष्ट असेल आणि,

(ब) उपरोक्त ३६ महिन्यातील शेवटचा महिना मार्च नसेल, तर अशा अंतिम महिन्याच्या शेवटी असलेल्या शिल्लक रकमेत, ज्या वित्तीय वर्षात मृत्यू झाला असेल त्याच्या प्रारंभापासून उक्त अंतिम महिन्याच्या शेवटपर्यंतच्या मुदतीचे व्याज समाविष्ट करण्यात येईल.

**टीप (२).**–या योजनेखालील घ्यावयाची रक्कम पूर्ण रुपयात असेल. देय रकमेमध्ये अपूर्ण रुपया असेल तर त्याचे नजीकच्या आकड्यापर्यंत पूर्ण रुपयात रूपांतर करण्यात यावे (५० पैसे लगत पुढील रुपया इतके मानण्यात यावेत.)

**टीप (३).**–या योजनेखाली देय असलेली कोणतीही रक्कम विम्याच्या पैश्याच्या स्वरूपात असते आणि म्हणून भविष्य निर्वाह निधी आणि संकीर्ण उपबंध अधिनियम, १९२५ (१९२५ चा १९) याच्या कलम ३ द्वारे देण्यात आलेले सांविधिक संरक्षण अशा रकमेस लागू होणार नाही.

**टीप (४).**–एखाद्या शासकीय विभागाचे एखाद्या स्वायत्त संस्थेमध्ये रूपांतर झाल्यानंतर ज्या वर्गणीदारांची अशा स्वायत्त संघटनेकडे बदली झाली असेल आणि अशी बदली झाल्यानंतर त्यांना देण्यात आलेले पर्यायानुसार ज्यांनी या नियमानुसार या निधीमध्ये वर्गणी देण्याचा पर्याय स्वीकारला असेल, अशा वर्गणीदारांना सुद्धा ही योजना लागू होईल.

**टीप (५).**–नियम ३२ किंवा ३३ अन्वये ज्याला या निधीचे लाभ मिळणार असतील परंतु निधीमध्ये दाखल करून घेतल्याच्या तारखेपासून प्रकरणपरत्वे तीन वर्षाची किंवा पाच वर्षाची सेवा पूर्ण होण्यापूर्वी जो मरण पावला असेल अशा शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, त्याने पूर्वीच्या मालकाकडे केलेल्या ज्या सेवेच्या संबंधातील त्यांच्या वर्गणीची रक्कम आणि मालकाचे अंशदान, कोणतेही असल्यास, व्याजासह जमा केले असेल त्या सेवेचा असा कालावधी खंड (अ) आणि (क) यांच्या प्रयोजनाकरिता हिशोबात घेण्यात येईल.

**टीप (६).**——पदावधीच्या तत्वावर नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तींच्या बाबतीत आणि पुन्हा नोकरीत ठेवलेल्या निवृत्तीवेतनधारींच्या बाबतीत, अशा नियुक्तीच्या किंवा प्रकरणपरत्वे पुनर्नियुक्तीच्या तारखेपासून केलेली सेवाच फक्त, या नियमाच्या प्रयोजनासाठी हिशेबात घेण्यात येईल. ही योजना करार तत्वावर नेमलेल्या व्यक्तींना लागू होणार नाही.

**टीप (७).**——या योजनेच्या संबंधातील खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज खर्चाचा कल लक्षात घेऊन संबंधित विभाग प्रमुखाकडून तयार करण्यात येतील.

३१. **निधीतील जमा रकमेचे हस्तांतरण.**——शासकीय कर्मचाऱ्यांची केंद्र किंवा राज्य सरकारच्या अधिपत्याखालील स्थानिक संस्था किंवा स्वायत्त संस्था अशी किंवा याउलट बदली झाली असता कार्यपद्धती——

(१) शासकीय कर्मचाऱ्यांची, कोणत्याही बिगर अंशदायी भविष्य निर्वाह निधीचा वर्गणीदार असताना महाराष्ट्र शासनाखालील निवृत्तीवेतनायोग्य सेवेत कायम बदली झाली व अशा सेवेत त्याला हे नियम लागु होत असतील तर त्याच्या नावे जमा असलेली अशा अन्य निधीतील वर्गणीची रक्कम त्यावरील व्याजासह, त्या शासनाच्या संमतीने त्यांच्या नावे या निधीत हस्तांतरीत करण्यात येईल.

(२) परंतु, ज्या बाबतीत एखादा वर्गणीदार स्थानिक संस्था किंवा स्वायत्त मंडळाच्या बिगर अंशदायी भविष्य निर्वाह निधीमध्ये वर्गणी भरत असेल त्याबाबतीत त्या स्थानिक संस्थेची किंवा स्वायत्त मंडळाची संमती घेण्यात येईल.

(३) शासकीय कर्मचाऱ्यांची, कोणत्याही अंशदायी भविष्य निर्वाह निधीचा वर्गणीदार असताना महाराष्ट्र शासनाखालील निवृत्तीवेतन योग्य सेवेत कायम बदली झाली व अशा सेवेत त्याला हे नियम लागू होत असतील तर, अशा निधीकरिता हे नियम पुढेही लागू व्हावेत अशी वर्गणीदाराने निवड केलेली नसेल तर——

(अ) त्याच्या बदलीच्या दिनांकाला अशा अंशदायी भविष्य निर्वाह निधीतील त्यांच्या नावे जमा असलेली वर्गणीची रक्कम त्यावरील व्याजासह अन्य शासनाच्या, किंवा स्थानिक संस्था/स्वायत्त मंडळाच्या (कोणतेही असल्यास) संमतीने त्यांच्या खात्यावर निधीत हस्तांतरीत करण्यात येईल.

(ब) अशा अंशदायी भविष्य निर्वाह निधीत त्याच्या नावे असलेली शासनाच्या स्थानिक/स्वायत्त मंडळाच्या अंशदानाची रक्कम तिच्यावरील व्याजासह, अन्य शासनाला, स्थानिक/स्वायत्त संस्थेला कोणतेही असल्यास, परत करण्यात येईल व राज्याच्या महसूलात जमा करण्यात येईल.

(क) त्यास लागू असलेल्या निवृत्तीवेतंन नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या मर्यादेपर्यंत कायम बदलीच्या तारखेपूर्वी त्याने व्यतीत केलेला सेवावधी, निवृत्तीवेतनासाठी जमेस धरण्याचा त्यानंतर त्याला हक्क राहील.

**टीप (१).**—या नियमाच्या तरतुदी, जो वर्गणीदार सेवानिवृत्त झाला असेल व सेवेत खंड पडून किंवा न पडून ज्यास पुन्हा नोकरीत ठेवले असेल किंवा ज्या वर्गणीदाराची आधीची नियुक्ती करारावर केलेली असेल, त्याच्या बाबतीत लागू असणार नाहीत.

**टीप (२).**—तथापि, या नियमाच्या तरतुदी केंद्र शासनाच्या किंवा दुसऱ्या राज्य शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या दुसऱ्या विभागातील सेवेतून राजीनामा दिल्यानंतर/कपात केल्यानंतर ज्या व्यक्तींची नियुक्ती सेवेत खंड न पडता या नियमांचा लाभ मिळणाऱ्या पदावर करण्यात आलेली असेल मग ती तात्पुरती असो किंवा कायम स्वरूपाची असो त्या व्यक्तींना लागू होतील.

३२. **शिल्लक रकमेचे हस्तांतरण.**—भविष्य निर्वाह निधीचे लाभ मिळत असलेला एखादा शासकीय कर्मचारी जर यापूर्वी शासनाच्या मालकीच्या आणि नियंत्रणाखाली असलेल्या निगमाच्या किंवा संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये

नोंदणी केलेल्या कोणत्याही स्वायत्त संघटनेच्या भविष्य निर्वाह निधीच्या वर्गणीदार असेल तर, अशा भविष्य निर्वाह निधीतील त्याच्या नावे जमा रकमा त्या निगमाच्या किंवा यथास्थिती, संघटनेच्या संमतीने निधीत त्याच्या नावे हस्तांतरीत करण्यात येतील.

३३. **महाराष्ट्र अंशदायी भविष्य निर्वाह निधीमध्ये शिल्लक रकमेचे हस्तांतरण.**—निधीच्या वर्गणीदारास नंतर महाराष्ट्र अंशदायी भविष्य निर्वाह निधीचे लाभ घेण्याची परवानगी दिली तर त्याच्या वर्गणीची रक्कम, त्यावरील व्याजासह, त्यांच्या महाराष्ट्र अंशदायी भविष्य निर्वाह निधीतील खात्यावर हस्तांतरित करण्यात येईल.

**टीप.**—या नियमाच्या तरतुदी, ज्या वर्गणीदाराची नियुक्ती करारावर केली असेल किंवा जो सेवानिवृत्त झाला असून ज्याची नंतर अंशदायी भविष्य निर्वाह निधीचे लाभ मिळणाऱ्या अन्य पदावर, त्याच्या सेवेत खंड पडून किंवा खंड न पडता पुन्हा नियुक्ती झाली असेल अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत लागू होणार नाहीत.

३४. **नियम शिथिल करणे.**—व्यक्तीगत प्रकरणात नियम शिथिल करणे या नियमांपैकी कोणत्याही नियमाच्या प्रवर्तनाने वर्गणीदाराला विनाकारण त्रास होत आहे किंवा होण्याची शक्यता आहे याबाबत शासनाची खात्री पटली तर, या नियमात काहीही अंतर्भूत असले तरी, शासनास वर्गणीदाराचे असे प्रकरण आपणास न्याय व योग्य वाटेल अशा रीतीने निकालात काढता येईल.

**टीप.**—या नियमाअंतर्गत मिळणारी शिथिलता, निवृत्तीपूर्व रजेवर जाण्यापूर्वी किंवा प्रत्यक्ष सेवानिवृत्तीनंतर मिळणार नाही, कारण, तसे करणे भविष्य निर्वाह निधी आणि संकीर्ण तरतुदी अधिनियम, १९२५ च्या कलम २ (अ) च्या विरुद्ध आहे.

## कार्यपद्धती विषयक नियम

३५. **वर्गणीचे प्रदान करताना लेखा क्रमांक नमूद करणे.**—जेव्हा भारतात, एकतर वित्तलब्धीमधून वजावटी करून किंवा रोख स्वरूपात वर्गणी भरावयाची असेल तेव्हा, आहरण व संवितरण अधिकारी किंवा प्रकरणपरत्वे वर्गणीदार लेखा अधिकाऱ्याने त्यास कळविलेला वर्गणीदाराच्या निधीतील लेखा क्रमांक नमूद करील. त्याचप्रमाणे क्रमांकातील कोणताही बदल वर्गणीदाराला लेखा अधिकाऱ्यांकडून कळविण्यात येईल.

३६. **वर्गणीदाराला लेखा विवरणपत्र पाठविणे.**—वर्गणीदाराला पाठवावयाचे लेखा विवरणपत्र (१) लेखा अधिकारी प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्च नंतर शक्य तितक्या लवकर, जेथे तो काम करीत आहे त्या कार्यालयामार्फत, प्रत्येक वर्गणीदाराला निधीतील त्यांच्या लेख्याचे विवरणपत्र पाठवील. अशा विवरणपत्रात वर्षातील १ एप्रिल रोजीची प्रारंभिक शिल्लक, वर्षात जमा केलेली किंवा काढलेली एकूण रक्कम, वर्षाच्या ३१ मार्च रोजी जमा केलेली व्याजाची एकूण रक्कम आणि त्या दिनांकाची अखेरची शिल्लक नमूद करण्यात येईल.

लेखा अधिकारी लेख्याच्या विवरणपत्रास.—

(अ) नियम ५ अन्वये नामनिर्देशनात काही बदल करावयाची वर्गणीदाराची इच्छा आहे काय,

(ब) नियम ५, पोट-नियम (१) च्या परंतुकान्वये वर्गणीदाराच्या कुटुंबातील सदस्याच्या नावे कोणतेही नामनिर्देशन केलेले नसेल तर त्याचे कुटुंब आहे की काय, याबाबतची विचारणा जोडील.

(२) वर्गणीदारांनी वार्षिक विवरणपत्र बिनचूक असल्याबद्दल आपली खात्री करून घेतली पाहिजे व विवरणपत्र मिळाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यात लेखा अधिकाऱ्यांच्या निदर्शनास चुका आणून दिल्या पाहिजेत.

(३) लेखा अधिकारी, वर्गणीदाराला आवश्यक असेल तर, ज्या महिन्याचा लेखा लिहिण्यात आला आहे त्या शेवटच्या महिन्याच्या अखेरीस निधीत त्याच्या नावे असलेली एकूण रक्कम वर्षातून एकदा पण अधिक वेळा नव्हे, त्याला कळवील.

**टीप (१)**.—लेखा अधिकाऱ्याकडून वार्षिक लेखा विवरणपत्रे प्राप्त झाल्यानंतर कार्यालय प्रमुखाने त्याचे संबंधित सर्व वर्गणीदारामध्ये वितरण करावे आणि शिल्लक रकमांबाबत त्याची मान्यता घ्यावी.

**टीप (२)**.—कोणत्याही वर्गणीदारास जर असे दिसून आले की, वार्षिक लेखा विवरणपत्रात त्याच्या खाती दर्शविलेली जमा रक्कम त्याने प्रत्यक्ष वर्गणी दिलेल्या/काढलेल्या रकमेपेक्षा कमी आहे किंवा अन्य रितीने चूक आहे तर तो कार्यालय प्रमुखाला तात्काळ अभिवेदन सादर करील, संबंधित लेखा अधिकाऱ्याला अभिवेदन पाठवतांना, कार्यालय प्रमुख वर्षभरात वर्गणीदाराच्या वेतनातून वजात केलेल्या वर्गण्यांचे महिनावार विवरण देऊन किंवा ज्यामध्ये वजात केली होती किंवा प्रकरणपरत्वे पैसे काढले होते, त्या बिलाच्या तपशिलासह (तपशिलामध्ये वर्गणीदाराचा कोषागार प्रमाणक क्रमांक, दिनांक व एकूण वर्गणीची रक्कम आणि परत केलेली रक्कम यांचा समावेश असेल) प्रमाणपत्र देईल.

**टीप (३)**.—वार्षिक लेखा विवरणपत्र प्राप्त झाल्याच्या तारखेपासून तीन महिन्याच्या आत, संबंधित लेखा अधिकाऱ्याला स्वीकृतीची सूचना एकत्रितपणे पाठवावी. लेखा अधिकारी यानंतर गहाळ झालेल्या जमेच्या/खर्चाच्या रकमा शोधण्यास लगेचच प्रारंभ करेल आणि महानियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी यासंबंधात विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार वर्गणीदाराच्या लेख्यांमध्ये त्याचे समायोजन करील आणि योग्य त्या दुरुस्त्या केलेल्या आहेत यासंबंधी आवश्यक ती सूचना कार्यालय प्रमुखामार्फत वर्गणीदाराला पाठवील.

**टीप (४)**.—वर्गणीदाराच्या खात्यातील गहाळ झालेल्या जमा/खर्च रकमा अनुषांगिक पुरावा पाहून रु. ५०० पर्यंत रक्कम अधिकाऱ्याच्या आदेशावरुन व त्यापेक्षा अधिक रक्कम गट अधिकाऱ्यांच्या आदेशावरुन समायोजित करण्यात येतील.

**टीप (५)**.—नियम २८ (४) मध्ये तरतूद केल्यानुसार अंतिम जमा रक्कम काढण्याचा अर्ज कार्यालय प्रमुखाकडून वर्गणीदाराकडे आल्यानंतर, या नियमात विहित केलेल्या कालमर्यादेत त्यावर कृती करण्यात त्याने कसूर केल्यास, त्या नियमातील नियम १२ मध्ये तरतूद केल्यानुसार व्याज मिळण्याचा त्याला हक्क असणार नाही.

३७. **अडचणीचे निराकरण**.—या नियमाची अर्थउकल करण्याच्या संबंधात कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास तो शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडे निर्णयार्थ सोपविण्यात येईल. त्यावरील शासनाचा निर्णय अंतिम असेल.

३८. **निरसन आणि व्यावृत्ती**.—(१) महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम याद्वारे निरसित करण्यात येत आहेत.

(२) या नियमातील कोणत्याही गोष्टींचा परीणामी यापूर्वी विद्यमान असलेला सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी समाप्त होणार नाही किंवा कोणताही नवा निधी स्थापन होणार नाही.

## अनुसूची-एक

[ नियम ५(३) पहा ]

नमुना "अ"

[ नमुना भरण्यापूर्वी मागील पृष्ठावर छापलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात ]

### नामनिर्देशनाचा नमुना

भविष्य निर्वाह निधी लेखा क्रमांक †

*कुटुंब असलेल्या
————— वर्गणीदाराच्या वापरासाठी
*कुटुंब नसलेल्या

(१) मी ‡ .................................................. याद्वारे, माझी भविष्य निर्वाह निधीतील रक्कम मला देय होण्यापूर्वी अथवा ती देय झालेली असून, देण्यात आलेली नसेल अशा वेळी माझा मृत्यू झाल्यास, निधीमध्ये माझा खात्यावर जमा झाली असेल अशी रक्कम घेण्यास, मुंबई सर्दसाधारण भविष्य निर्वाह निधी, नियम २ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे माझ्या कुटुंबातील खाली निर्दिष्ट

*केलेल्या व्यक्तीला
————— नामनिर्दिष्ट करीत आहे आणि असा निदेश देत आहे की,
*केलेल्या व्यक्तींना

तिच्या नावासमोर
*उक्त रक्कम,————— दिलेल्या पद्धतीने ————— *उक्त व्यक्तीला देण्यात यावी
त्यांच्या नावासमोर
*उक्त व्यक्तींमध्ये वाटून देण्यात यावी

तिचे नाव .................................................. आहे.

—————————————————

त्यांची नावे .................................................. अशी आहेत.

[२] मी ‡ ........... महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियमांपैकी नियम २ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, कुटुंब धारण करीत नसल्या कारणाने, माझी भविष्य निर्वाह निधीमधील रक्कम मला देय होण्यापूर्वी अथवा ती देय झालेली असून देण्यात आलेली नसेल अशा वेळी माझा मृत्यू झाल्यास निधीमध्ये माझ्या खात्यावर जमा झालेली अशी रक्कम घेण्यास खाली निर्दिष्ट केलेल्या व्यक्तीला*
————— याद्वारे नामनिर्दिष्ट करीत आहे आणि असा निदेश देत आहे की,
व्यक्तींना*

तिच्या
उक्त रक्कम ————— नावासमोर खाली नमूद केलेल्या पद्धतीने उक्त व्यक्तीला देण्यात यावी.
त्याच्या

/उक्त व्यक्तींमध्ये वाटून देण्यात यावी.

तिचे नाव .................................................. आहे.

त्यांची नावे .................................................. आहेत.

त्यानंतर मी कुटुंब प्राप्त केल्यास हे नामनिर्देशन अवैध ठरेल.

| नामनिर्देशित व्यक्तिचे नाव व पूर्ण पत्ता व्यक्तिंची नावे व पूर्ण पते | वर्गणीदाराशी असलेले नाते | नामनिर्देशित व्यक्तिचे वय | (प्रत्येक नामनिर्देशित) व्यक्तिला देय असलेला रकमेचा भाग | ज्या घटना घडल्यामुळे नामनिर्देशन विधी अग्राह्य ठरेल अशा आकस्मिक घटना | वर्गणीदाराच्या आधी नामनिर्देशित व्यक्ती मरण पावल्यास तिचा हक्क ज्या व्यक्तिकडे जाईल त्या व्यक्तिचे/ व्यक्तिंची नावे, पत्ता आणि नाते |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | | |

दिनांक : .................... २०० ....................

ठिकाण :

वर्गणीदाराची स्वाक्षरी

स्वाक्षरीचे दोन साक्षीदार :

| | नाव | पत्ता | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १. | .................... | .................... | .................... |
| २. | .................... | .................... | .................... |

कार्यालय प्रमुखाच्या/महालेखाकाराच्या कार्यालयातील वापरासाठी

श्री./श्रीमती/कुमारी .................... यांनी केलेले नामनिर्देशनपत्र

पदनाम ....................

नामनिर्देशन पत्र मिळाल्याचा दिनांक ....................

स्वाक्षरी ....................

(कार्यालय प्रमुखाचे पदनाम)

दिनांक ....................

स्वाक्षरी ....................

लेखा अधिकारी

महालेखाकार यांचे कार्यालय

दिनांक ....................

**सूचना.–** * लागू नसलेला अथवा अनावश्यक मजकूर खोडावा.

† येथे वर्गणीदाराने स्वतःचा भविष्य निर्वाह निधी लेखा क्रमांक लिहावा.

‡ येथे वर्गणीदाराने स्वतःचे नाव लिहावे.

(१) महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियमांतील कुटुंब या शब्दाची व्याख्या खाली पुनधृत केली आहे.

कुटुंब याचा अर्थ,—

(अ) पुरुष वर्गणीदाराच्या बाबतीत, वर्गणीदाराची बायको किंवा बायका, आई-वडील, मुले, अज्ञान भाऊ, अविवाहीत बहिणी, वर्गणीदाराच्या मयत मुलाची विधवा पत्नी आणि त्याची मुले (वर्गणीदाराचे आई-वडील जिवंत नसतील तर) पैतृक परंपरेने (मामाकडून) आजी, आजोबा :

परंतु, जर वर्गणीदाराने त्यांची पत्नी न्यायिकरित्या त्यांच्यापासून विभक्त झाली आहे किंवा ती ज्या जातीची आहे त्या जातीच्या रुढीगत विधीनुसार तिने निर्वाहाचा हक्क गमावला आहे असे सिद्ध करून दाखवले तर, हे नियम ज्याबाबतीत लागू होतात त्याबाबतीत ती यापुढे वर्गणीदाराच्या कुटुंबातील व्यक्ती मानली जाणार नाही. तथापि, जर वर्गणीदार नंतर स्पष्ट लेखी निवेदनाद्वारे अशी व्यक्ती कुटुंबातील व्यक्ती मानण्यात यावी, असे लेखा अधिकाऱ्यांस कळविल तर ती व्यक्ती वर्गणीदाराच्या कुटुंबातील व्यक्ती म्हणून समजण्यात येईल.

(ब) स्त्री वर्गणीदाराच्या बाबतीत, वर्गणीदाराचा पती, आई-वडील, मुले, अज्ञान भाऊ, अविवाहित बहिणी, वर्गणीदाराच्या मृत मुलांची विधवा बायको आणि तिची मुले आणि (वर्गणीदाराचे आई-वडील जिवंत नसतील तर) पैतृक पद्धतीने (बापाकडून) आजा, आजोबा :

परंतु, महिला वर्गणीदाराने तिच्या पतीला कुटुंबातून वगळण्यात यावे अशी इच्छा लेखी व्यक्त केली असेल त्याबाबतीत त्या वर्गणीदाराने लेखी निवेदन करून त्यानंतर इच्छा रद्द केली नसेल तर, हे नियम ज्या बाबीच्या संबंधात लागू असतील, त्या बाबींपुरते त्यास यापुढे कुटुंबातील व्यक्ती समजण्यात येणार नाही. मुले याचा अर्थ औरस संतती असा आहे व वर्गणीदारास लागू असलेल्या व्यक्तिगत कायद्यानुसार जर मूल दत्तक घेणे कायदेशिररित्या मान्य असेल तर, दत्तक घेण्यात आलेल्या मुलांचा त्यात समावेश करण्यात येईल.

(२) केवळ एकाच व्यक्तिला नामनिर्देशित करण्यात आले असेल तर, नामनिर्देशित व्यक्ती नावासमोर स्तंभ (४) मध्ये पूर्ण रक्कम असे लिहीण्यात यावे. एकापेक्षा अधिक व्यक्तिंना नामनिर्देशित केले असेल तर, भविष्य निर्वाह निधीच्या संपूर्ण रकमेतील किती हिस्सा नामनिर्देशितीला देय आहे ते प्रत्येक नामनिर्देशित व्यक्तिच्या नावासमोर स्तंभ (४) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात यावे.

(३) नामनिर्देशित व्यक्ती मृत्यू ही घटना आकस्मिक घटना म्हणून स्तंभ (५) मध्ये नमूद करू नये.

(४) वर्गणीदाराने स्वतःचे नाव स्तंभ (६) मध्ये नमूद करू नये.

(५) वर्गणीदाराने नामनिर्देशनावर स्वाक्षरी केल्यानंतर त्यामध्ये आणखी कोणतीही नावे समाविष्ट करता येऊ नयेत म्हणून शेवटच्या नोंदीनंतरच्या रिकाम्या जागेत तिरप्या रेषा काढाव्यात.

# अनुसूची दोन

[नियम १३]

## तात्पुरती अग्रिमे मंजूर करण्यास सक्षम असलेले प्राधिकारी

१. ज्या अग्रिमाच्या मंजुरीसाठी नियम १३, पोट-नियम (१) व (३) खाली विशेष कारणांची आवश्यकता नसते, असे अग्रिम कार्यालयाच्या प्रभारी स्थानिक राजपत्रित अधिकाऱ्याला व अशा राजपित्रत अधिकाऱ्यांच्या बाबतीत त्यांच्या लगत वरिष्ठ प्रशासकीय प्राधिकाऱ्याला मंजूर करता येईल.

**स्पष्टीकरण.**—कार्यालयाचा "प्रभारी स्थानिक राजपत्रित अधिकारी" याचा अर्थ—

(अ) एखाद्या विभाग प्रमुखाच्या कार्यालयाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कार्यालयाच्या संबंधात, त्या कार्यालयाचा प्रशासकीय प्रभारी असेल असा निकटवर्ती राजपत्रित अधिकारी ; आणि

(ब) विभाग प्रमुखाच्या कोणत्याही कार्यालयाच्या संबंधात, त्या विभाग प्रमुखाने त्याबाबतीत नामनिर्देशित केलेला कोणताही राजपत्रित अधिकारी असा आहे :

परंतु, जो अधिकारी बदलीच्या वेळी स्वतःला वेतन अग्रिम मंजूर करण्यास सक्षम असेल त्याच्या बाबतीत, भविष्य निर्वाह निधीतील अग्रिम त्याच्या निकट वरिष्ठ प्रशासकीय प्राधिकारी मंजूर करू शकेल.

२. ज्या अग्रिमाच्या मंजुरीसाठी नियम १३, पोट-नियम (१) व (३) खाली विशेष कारणांची आवश्यकता असते असे अग्रिम, स्तंभ (१) मध्ये नमूद केलेल्या वर्गणीदारांच्या बाबतीत, स्तंभ (२) मध्ये त्यांच्या नावापुढे नमूद केलेले प्राधिकारी मंजूर करू शकतील.

| (१) | (२) |
|---|---|
| (१) विभाग प्रमुख | संबंधित प्रशासकीय विभाग |
| (२) शासनाने विभागीय प्रमुखावर सोपविलेल्या सर्व अधिकारांचा वापर करण्यास प्राधिकृत असलेले प्रादेशिक प्रमुख व प्रादेशिक कार्यालये. | विभाग प्रमुख |
| (३) मुंबई शहर पोलिस वगळून, पोलिस विभागातील अराजपत्रित वर्गणीदार. | पोलिस उप-महानिरीक्षक |
| (४) मुंबईच्या शेरीफांच्या आस्थापनेतील कर्मचारी. | मुंबईचे शेरीफ |
| (५) संचालक, विकास विभाग चाळी, मुंबई यांच्या आस्थापनेतील कर्मचारी. | संचालक, विकास विभाग चाळी, मुंबई. |
| (६) वरील (१) ते (५) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वर्गणीदारांव्यतिरिक्त इतर वर्गणीदार. | महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ च्या परिशिष्ट (दोन) मध्ये विनिर्दिष्ट विभाग प्रमुख किंवा प्रकरणपरत्वे, शासनाने विभाग प्रमुखावर सोपविलेल्या सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी प्राधिकृत असलेले प्रादेशिक प्रमुख. |

परंतु, कोणत्याही विशिष्ट प्रकरणी स्तंभ २ मध्ये नमूद केलेला प्राधिकारी हा ज्या अग्रिमाच्या मंजुरीसाठी नियम १३, पोटनियम (१) व (३) खाली विशेष कारणांची आवश्यकता नसते असे अग्रिम मंजूर करण्यास सक्षम असणारा प्राधिकारी असेल तर, भविष्य निर्वाह निधीतील हे अग्रिम फक्त त्याच्या निकटचा वरिष्ठ प्रशासकीय प्राधिकारीच मंजूर करू शकेल.

**स्पष्टीकरण.**–महाराष्ट्र शासनाच्या विभागाचा निकट वरिष्ठ प्रशासकीय म्हणजे महाराष्ट्र शासनच होय.

आणखी असे की, नियम १३, पोटनियम (१) खंड अ खालील आजारपणासाठी असलेल्या ज्या अग्रिमाच्या मंजुरीसाठी त्या नियमाच्या पोटनियम (१) खंड (३) खाली विशेष कारणांची आवश्यकता असेल अशा बाबतीत परिच्छेद १ मध्ये नमूद केलेल्या प्राधिकाऱ्याला, ज्याच्या मंजुरीसाठी विशेष कारणाची आवश्यकता आहे असे अग्रिम मंजूर करण्यास अन्यथा जो सक्षम आहे त्या प्राधिकाऱ्याला सूचना देऊन अशी रक्कम मंजूर करता येईल.

**३.** संघराज्याच्या सेवेत असलेल्या कोणत्याही व्यक्तीस याबाबतीत केलेल्या कोणत्याही विधीअन्वये किंवा तद्नुसार सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीचा वर्गणीदार होण्याचा हक्क असेल अशा कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत नियम, १३, पोटनियम (१) खंड (३) खाली अग्रिमाच्या मंजूरीसाठी विशेष कारणांची आवश्यकता असत नाही असे अग्रिम, तसेच त्या खंडानुसार ज्या अग्रिमाच्या मंजुरीसाठी विशेष कारणे आवश्यक असतात असे अग्रिम मंजूर करण्यास सक्षम प्राधिकारी, संघराज्य शासन राहील.

**४.** एका विभागातून दुसऱ्या विभागाकडे प्रतिनियुक्तीवर गेलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, त्याची सेवा उसनी घेणारा विभाग, नियम १३, पोटनियम (१) खाली विशेष कारणे आवश्यक आलेले अग्रिम मंजूर करण्यास सक्षम असेल.

## अनुसूची तीन

(नियम २२)

मी याद्वारे असे घोषित करतो की, महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीतील माझ्या खात्यावर जमा असलेली रक्कम काढून बांधलेले/खरेदी केलेले घर/सदनिका (प्लॅट) किंवा घरासाठी खरेदी केलेली जमीन विकून, गहाण ठेवून, अदलाबदल करून किंवा देणगी म्हणून देऊन किंवा तीन वर्षाहून अधिक असणाऱ्या मुदतीसाठी भाडेपट्टयाने देऊन किंवा इतर प्रकारे, मंजूर करणाऱ्या प्राधिकाऱ्याच्या लेखी पूर्व मंजूरीशिवाय हस्तांतरीत केलेली नाही व मी असे वचन देतो की, जर तसे करण्यास मला फर्माविण्यात आले तर मी ते घर/सदनिका (प्लॅट) घराची जागा माझ्या एकट्याच्या पूर्णपणे मालकीची आहे हे दर्शविणाऱ्या व उक्त प्राधिकारी विनिर्दिष्ट करील अशा कराच्या पावत्या, हक्कविलेख व असे अन्य दस्तऐवज, मंजूर करणाऱ्या प्राधिकाऱ्याकडे सादर करीन.

दिनांक .................................. २००

साक्षीदार (पत्त्यासह)

(१) .................................. **स्वाक्षरी** ................................

..................................

(२) .................................. पदनाम ................................

..................................

# परिशिष्ट-अ

## भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९२५

## **१९२५ चा अधिनियम क्रमांक एकोणीस**

## **(अद्यावत सुधारित)**

(२७ ऑगस्ट, १९२५)

शासकीय भविष्य निर्वाह निधी, इतर भविष्य निर्वाह निधीसंबंधीच्या निधीत सुधारणा करण्यासाठी व तो एकत्रित करण्यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी,** शासकीय व इतर भविष्य निर्वाह निधीसंबंधीच्या निधीत सुधारणा करणे व तो एकत्रित करणे इष्ट आहे; त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

१. **संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.**—(१) या अधिनियमास भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९२५ असे म्हणता येईल.

(२) तो जम्मू व काश्मीर खेरीज संपूर्ण भारतास लागू असेल.

(३) हा अधिनियम केंद्र सरकार शासकीय राजपत्रात अधिसूचनेद्वारे नियुक्त करील अशा दिनांकास अंमलात येईल.

२. **व्याख्या.**—विषयात किंवा संदर्भात एतद्विरुद्ध काही नसेल, तर या अधिनियमात—

(अ) " सक्तीची ठेव " या शब्दप्रयोगाचा अर्थ, आयुर्विम्याचा हप्ता देण्याच्या किंवा कौटुंबिक निवृत्तिवेतनाची वर्गणी किंवा हप्ता भरण्याच्या प्रयोजनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनासाठी अथवा विशिष्ट आकस्मिक घटना घडून आल्याशिवाय मागणी केली असता जे देता येत नाही अशी भविष्य निर्वाह निधीसाठी दिलेली वर्गणी किंवा निधीत जमा असलेली ठेवीची रक्कम, असा आहे आणि यात, अशा वर्गणीत, अंशदानात किंवा ठेवीत निधीच्या नियमान्वये उपार्जित केलेले व्याज किंवा वाढ, तसेच अशी कोणतीही आकस्मिक घटना घडून आल्यानंतर वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या खाती जमा असलेली कोणतीही वर्गणी, ठेवीची रक्कम, अंशदान, व्याज किंवा वाढ यांचासुद्धा समावेश होईल ;

(ब) " अंशदान " याचा अर्थ, निधी प्रशासित करणाऱ्या कोणत्याही प्राधिकाऱ्याने भविष्य निर्वाह निधीतील वैयक्तिक लेख्यात भर घालून किंवा वर्गणी अथवा ठेव म्हणून जमा केलेली कोणतीही रक्कम किंवा वैयक्तिक लेख्यात असलेली शिल्लक असा आहे व " अंशदायी भविष्य निर्वाह निधी " म्हणजे ज्या भविष्य निर्वाह निधीच्या नियमात अंशदाने जमा करण्याची तरतूद केलेली असेल तो भविष्य निर्वाह निधी ;

(क) " अवलंबून असलेली व्यक्ती " याचा अर्थ, भविष्य निर्वाह निधीचा मृत वर्गणीदार किंवा त्यात ठेव ठेवणाऱ्याचे पुढीलपैकी कोणतेही नातेवाईक म्हणजे पत्नी, पति, आई, बाप, मूल, अज्ञान भाऊ, अविवाहित बहिण व मृत मुलाची विधवा व मूल व जेथे वर्गणीदाराची किंवा ठेव ठेवणाऱ्याची आई, बाप हयात नसतील, तेथे पैतृक आजा-आजी असा आहे.

(ड) " शासकीय भविष्य निर्वाह निधी " याचा अर्थ शासकीय सेवेतील व्यक्तींचा कोणताही वर्ग किंवा कोणतेही वर्ग यांच्यासाठी किंवा शैक्षणिक संस्थेत कामावर असलेल्या व्यक्ती किंवा फक्त शैक्षणिक प्रयोजनासाठी अस्तित्वात असलेल्या संस्थेत कामावर असलेल्या व्यक्तीसाठी शासनाचे सचिव, केंद्र सरकार, राज्याचे प्रतिनिधी किंवा कोणत्याही राष्ट्र शासनाच्या प्राधिकाऱ्यांनी रेल्वे भविष्य निर्वाह निधी वगळता स्थापन केलेला निधी, असा आहे व या अधिनियमातील शासनाच्या निर्देशांचा अर्थ त्याप्रमाणे लावण्यात येईल ;

(इ) " भविष्य निर्वाह निधी " याचा अर्थ ज्यात कर्मचारीवर्गाच्या किंवा वर्गाच्या वर्गण्या किंवा ठेवीच्या रकमा स्वीकारल्या जातात व त्यांच्या वैयक्तिक लेख्यात ठेवण्यात येतात तो निधी असा आहे व यात कोणतेही अंशदान व अशी वर्गणी, ठेव किंवा अंशदानावर निधीच्या नियमान्वये उपार्जित होणारे कोणतेही व्याज किंवा वाढ अंतर्भूत आहे ;

(फ) " रेल्वे प्रशासन " याचा अर्थ--

(एक) युनायटेड किंग्डमच्या संसदेच्या विशेष अधिनियमान्वये किंवा भारतीय विधिअन्वये किंवा शासनाच्या संविदेअन्वये भारताच्या कोणत्याही भागात रेल्वे किंवा ट्राममार्ग प्रशासित करणारी कोणतीही कंपनी असा आहे ; किंवा

(दोन) केंद्र सरकार किंवा राज्य शासनाद्वारे प्रशासित केली जाणारी कोणतीही रेल्वे किंवा ट्राममार्ग यांचा व्यवस्थापक व त्यात, उपखंड (दोन) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रकरणात केंद्र सरकार किंवा, यथास्थिती, राज्य शासन यांचा अंतर्भाव होईल.

(ग) " रेल्वे भविष्य निर्वाह निधी " याचा अर्थ, रेल्वे कर्मचाऱ्यांना कोणत्याही वर्गासाठी किंवा वर्गांसाठी रेल्वे प्रशासनाच्या प्राधिकाऱ्याने स्थापन केलेला भविष्य निर्वाह निधी असा आहे.

३. **सक्तीच्या ठेवींचे संरक्षण.**—(१) कोणत्याही शासनाच्या भविष्य निर्वाह निधीत किंवा रेल्वे भविष्य निर्वाह निधीत ठेवलेली सक्तीची ठेव कोणत्याही प्रकारे अभिहस्तांकित करता येणार नाही किंवा ती प्रभारीत करता येणार नाही आणि वर्गणीदाराला किंवा ठेवीदाराला कोणत्याही कर्जाच्या किंवा दायित्वाच्या संबंधात कोणत्याही दिवाणी, महसुली किंवा फौजदारी न्यायालयाच्या कोणत्याही हुकूमनाम्यान्वये किंवा आदेशान्वये जप्त केली जाण्यास ती पात्र ठरणार नाही व प्रांतिक नादारी अधिनियम, १९२० (१९२० चा पाच) खाली नियुक्त केलेल्या कोणत्याही शासकीय अभिहस्तांकित किंवा न्यायालय धारकास अशा कोणत्याही सक्तीच्या ठेवीबाबत मागणी करण्याचा किंवा त्या रकमेसाठी दावा करण्याचा हक्क असणार नाही.

(२) कोणत्याही वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या मृत्युच्या वेळी अशा कोणत्याही निधीत असलेली व निधीच्या नियमान्वये वर्गणीदारावर व ठेवीदारावर अवलंबून असलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा त्याच्या वतीने रक्कम मिळण्यास विधीद्वारे प्राधिकृत केलेल्या अशा व्यक्तीस देय असलेली कोणतीही रक्कम या अधिनियमाद्वारे प्राधिकृत केलेल्या कोणत्याही वजावटीस अधीन राहून व जेथे अवलंबून असलेली व्यक्ती वर्गणीदाराची किंवा ठेवीदाराची विधवा किंवा मूल असेल ते खेरीज करून, तसेच या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी केलेल्या अभिहस्तांकनाखाली अभिहस्तांकितीच्या हक्कास अधीन राहून, अवलंबून असलेल्या व्यक्तीकडे निहित होईल. तसेच उपरिनिर्दिष्ट गोष्टीस अधीन राहून, अशी रक्कम मयत वर्गणीदाराचे किंवा ठेवीदाराचे कोणतेही कर्ज किंवा त्याने पत्करलेले कोणतेही दायित्व किंवा त्यांच्या मृत्युपूर्वी त्यांच्या आश्रित व्यक्तीने पत्करलेले दायित्व यापासून ती मुक्त राहील.

४. **परतफेडीचे उपबंध.**—(१) जेव्हा कोणत्याही शासनाच्या किंवा रेल्वे भविष्य निर्वाह निधीच्या नियमाखाली कोणत्याही वर्गणीदारांच्या किंवा ठेव ठेवणाऱ्यांच्या नावे असलेली रक्कम किंवा या अधिनियमाद्वारे प्राधिकृत केलेली कोणतीही रक्कम वजा केल्यानंतर राहिलेली शिल्लक देय होईल तेव्हा, वर्गणीदारास किंवा ठेव ठेवणाऱ्यास ती रक्कम किंवा, यथास्थिती, तिची शिल्लक देणे हे ज्या अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल, तो अधिकारी वर्गणीदारास किंवा ठेवीदारास, यथास्थिती, अशी रक्कम किंवा शिल्लक देईल किंवा जर तो मृत झाला असेल तर असा अधिकारी--

(अ) जर ती रक्कम किंवा तिची शिल्लक किंवा तिचा कोणताही भाग कलम ३ च्या उपबंधाखाली अवलंबून असलेल्या व्यक्तीकडे निहित केला असेल तर ती रक्कम, अवलंबून असलेल्या व्यक्तीला किंवा अशा व्यक्तीच्या वतीने रक्कम मिळण्यास विधीद्वारे प्राधिकृत केलेल्या इतर व्यक्तीस देईल ; किंवा

(ब) जर संपूर्ण रक्कम किंवा, यथास्थिती, शिल्लक रक्कम पाच हजारांहून अधिक नसेल तर अशी रक्कम किंवा खंड (अ) खाली जो देय नसेल असा तिचा कोणताही भाग निधीच्या नियमान्वये ती रक्कम मिळण्यास नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही व्यक्तीस देईल किंवा जर अशारितीने कोणत्याही व्यक्तीला त्याने नामनिर्देशित केली नसेल तर अशी रक्कम मिळण्यास अन्यथा जो हक्कदार असल्याचे त्यास वाटेल त्या कोणत्याही व्यक्तीला देईल ; किंवा

(क) कोणतीही रक्कम किंवा शिल्लक रक्कम किंवा खंड (अ) किंवा (ब) खाली जो देय नसेल असा तिचा कोणताही भाग—

(एक) निधीच्या नियमांच्या अनुसार, ती घेण्याकरिता नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही व्यक्तीने मृताच्या इस्टेटीचे प्रशासन करण्याकरिता तिला देण्यात आल्याचा पुरावा म्हणून संप्रमाण किंवा प्रशासनपत्र अथवा उत्तराधिकार प्रमाणपत्र अधिनियम, १८८९ (१८८९ चा ८) अन्वये दिलेले अथवा त्या इस्टेटीच्या धारकास अशा कोणत्याही रकमेचे, शिल्लक रकमेचे अथवा तिच्या काही भागाचे प्रदान स्वीकारण्यास हक्कदार ठरवणारे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर त्या व्यक्तीला अथवा,

(दोन) कोणतीही व्यक्ती नामनिर्देशित करण्यात आलेली नसेल तर जी कोणतीही व्यक्ती संप्रमाण किंवा प्रशासनपत्र किंवा प्रमाणपत्र सादर करील, अशा कोणत्याही व्यक्तीला देईल ;

परंतु, जेथे वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या नावे असलेली संपूर्ण रक्कम किंवा तिचा काही भाग कोणत्याही अन्य व्यक्तीस या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी अभिहस्तांकित करण्यात आला असेल व अभिहस्तांकनाची लेखी नोटीस अधिकाऱ्याला अभिहस्तांकितीकडून मिळाली तर असा अधिकारी या अधिनियमान्वये अधिकृत केलेली कोणतीही रक्कम वजा केल्यानंतर व वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या विधवेस किंवा मुलांना किंवा त्याच्या वतीने खंड (अ) खाली देय असलेली रक्कम—

(एक) जर वर्गणीदाराने किंवा ठेवीदाराने किंवा तो मरण पावला तर कोणत्याही विधिग्राह्य अभिहस्तांकिनाच्या अभावी या पोट-कलमाखाली रक्कम किंवा शिल्लक रक्कम जिला देय होईल त्या व्यक्तीने लेखी संमती दिली तर यथास्थिती अशी संपूर्ण रक्कम किंवा तिचा कोणताही भाग किंवा त्यापैकी शिल्लक रक्कम अभिहस्तांकितीस देईल ; किंवा

(दोन) जर अशी संमती देण्यात आली नाही तर ती रक्कम, तिचा भाग किंवा यथास्थिती शिल्लक रक्कम ती मिळण्यास हक्कदार असलेल्या व्यक्तीसंबंधी सक्षम दिवाणी न्यायालयाचा निर्णय होईपर्यंत रोखून ठेवील.

(२) पोट-कलम (१) द्वारे प्राधिकृत केलेली कोणतीही रक्कम प्रदान केल्यानंतर, वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या नावे असलेल्या रकमेतून जितकी रक्कम दिली गेली त्या मर्यादेपर्यंत, यथास्थिती शासन किंवा रेल्वे प्रशासन सर्व दायित्वातून मुक्त होईल.

**५. नामनिर्देशित व्यक्तीचे अधिकार.**—(१) त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही निधीत किंवा शासकीय किंवा रेल्वे भविष्य निर्वाह निधीत वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या नावे जमा असलेली रक्कम किंवा तिचा कोणताही भाग, याच्या केलेल्या कोणत्याही विनियोग व्यवस्थेत मग ती मृत्यूपत्रानुसार केलेली असो किंवा इतर प्रकारे केलेली असो-काहीही अंतर्भूत असेल तरीही, जेथे भविष्य निर्वाह निधीच्या नियमानुसार कोणतेही नामनिर्देशन केलेले असेल व तद्नुसार अशी संपूर्ण रक्कम किंवा तिचा कोणताही भाग देय होण्यापूर्वी किंवा देय झाल्यानंतर ती देण्यात येण्यापूर्वी वर्गणीदार किंवा ठेवीदार मरण पावेल अशा वेळी ती रक्कम किंवा तिचा कोणताही भाग कोणत्याही व्यक्तीला मिळण्याचा हक्क प्रदान केला जाणे, अभिप्रेत असेल तर, वर्गणीदाराचा किंवा ठेवीदाराचा पूर्वोक्तप्रमाणे मृत्यू झाल्यास, इतर सर्व व्यक्तींना वगळून उक्त व्यक्ती, अशी रक्कम किंवा यथास्थिती, तिचा भाग मिळण्यास हक्कदार राहील, मात्र—

(अ) अशा नामनिर्देशनात त्याच पद्धतीने केलेल्या दुसऱ्या नामनिर्देशनाद्वारे कोणत्याही वेळी फेरबदल करण्यात आलेला असता कामा नये किंवा या नियमान्वये विहित केलेल्या पद्धतीने व त्या प्राधिकाऱ्यास नोटीस देवून ते रद्द करण्यात आलेले असता कामा नये ; किंवा

(ब) असे नामनिर्देशन त्यात विनिर्दिष्ट केलेली एखादी आकस्मिक घटना घडल्यामुळे कोणत्याही वेळी विधीअग्राह्य झाले असता काम नये.

आणि जर, उक्त व्यक्तीचे वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या मृत्युपूर्वी निधन झाले तर ते असे नामनिर्देशन, उक्त व्यक्तीस प्रदान केलेल्या हक्काच्या मर्यादेपर्यंत अवैध ठरेल व ते परिणामक्षम असणार नाही :

परंतु, निधीच्या नियमानुसार नामनिर्देशनात मृत व्यक्तीखेरीज इतर कोणत्याही व्यक्तीस असे हक्क प्रदान करण्यासंबंधी तरतूद केली असेल तर असा हक्क, अशी व्यक्ती मरण पावल्यानंतर अशा दुसऱ्या व्यक्तीकडे जाईल.

(२) भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ किंवा १८२७ चा मुंबई विनियम आठ यात काहीही अंतर्भूत असले तरीही, अशा कोणत्याही व्यक्तीस, वर्गणीदार किंवा ठेवीदार मरण पावल्यानंतर अशी रक्कम किंवा, तिचा भाग मिळण्यास तिला हक्कदार करणारे त्या अधिनियमाखालील किंवा, यथास्थितीत, विनियमाखालील प्रमाणपत्र मिळण्याचा हक्क प्राप्त होईल व असे प्रमाणपत्र, अन्य कोणत्याही व्यक्तीला संप्रमाण किंवा मृताच्या इस्टेटीस प्रशासनपत्र दिल्यामुळे विधिअग्राह्य होणार नाही किंवा ते निष्प्रभावित झाल्याचे समजण्यात येणार नाही.

(३) भविष्य निर्वाह निधी (सुधारणा) अधिनियम, १९४६ च्या कलम २ च्या पोट-कलम (१) अन्वये सुधारणा केल्याप्रमाणे या कलमाचे उपबंध त्या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी केलेल्या सर्व नामनिर्देशनास लागू होतील :

परंतु, अशा रितीने सुधारणा करण्यात आलेल्या या कलमाच्या उपबंधामुळे, ज्या प्रकरणात उक्त दिनांकापूर्वी कोणतीही रक्कम देण्यात आली असेल किंवा त्या नियमानुसार योग्यरित्या केलेल्या कोणत्याही नामनिर्देशनानुसार निधीच्या नियमान्वये देय झाली असेल त्या कोणत्याही प्रकरणात बाध येणार नाही.

६. **रकमा वजा करण्याची शक्ती.**––वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या नावे कोणत्याही शासकीय भविष्य निर्वाह निधीत किंवा अंशदायी रेल्वे भविष्य निर्वाह निधीत जमा असलेली रक्कम जेव्हा देय होईल तेव्हा निधीच्या नियमात या बाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या प्राधिकाऱ्याने जर तसे निर्देशित केले असेल तर जमा रकमेतून खालीलप्रमाणे वजावटी करून त्या रकमा, शासनाला किंवा यथास्थिती, रेल्वे प्रशासनाला देता येतील :––

(अ) वर्गणीदाराला किंवा ठेवीदाराला शासनाच्या किंवा रेल्वे प्रशासनाच्या दायित्वाखाली देय असलेली पण वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या लेख्यात जमा केलेल्या कोणत्याही अंशदानाच्या एकूण रकमेहून अधिक नाही अशी रक्कम व अशा अंशदानावर उपार्जित झालेले कोणतेही व्याज किंवा दिलेली वाढ ; किंवा

(ब) जेथे वर्गणीदाराला किंवा ठेवीदाराला निधीच्या नियमांत या बाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कारणासाठी बडतर्फ करण्यात आले असेल, किंवा त्याने, त्याच्या सेवाप्रारंभापासून पाच वर्षाच्या आत अशा नोकरीचा राजीनामा दिला असेल तर अशा कोणत्याही अंशदानाची व्याजाची व वाढीची संपूर्ण रक्कम किंवा तिचा कोणताही भाग.

७. **सद्भावनेने केलेल्या कृत्यांसाठी संरक्षण.**––या अधिनियमाखाली सद्भावनेने केलेल्या किंवा केल्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य वैध कार्यवाही केली जाणार नाही.

८. **भविष्य निर्वाह निधीला हा *अधिनियम* लागू करण्याची शक्ती.**––(१) समुचित शासनास स्थानिक शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाचे उपबंध स्थानिक प्राधिकारी कर्ज अधिनियम, १९१४ च्या अर्थातंर्गत कोणत्याही स्थानिक प्राधिकाऱ्याने त्याच्या कर्मचाऱ्यांच्या लाभासाठी प्रस्थापित केलेल्या कोणत्याही भविष्य निर्वाह निधीला लागू होतील असा निर्देश देता येईल, असे घोषित केल्यानंतर हा अधिनियम असा भविष्य निर्वाह निधी हा जणू काही शासकीय भविष्य निर्वाह निधी व असा स्थानिक प्राधिकारी शासन आहे असे समजून त्यास लागू होईल.

(२) समुचित शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाचे उपबंध, अनुसूचित विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही संस्थांच्या कर्मचाऱ्यांच्या किंवा अशा संस्थांच्या कोणत्याही गटाच्या लाभासाठी प्रस्थापित केलेल्या भविष्य निर्वाह निधीस लागू होतील असा निदेश देता येईल व असे घोषित केल्यानंतर हा अधिनियम असा भविष्य निर्वाह निधी, हा जणू काही शासकीय भविष्य निर्वाह निधी आहे व निधीची अभिरक्षा करणारा प्राधिकारी, शासन आहे असे समजून लागू होईल :

परंतु कलम ६, हे त्या कलमात निर्दिष्ट केलेल्या अंशदान देणारा प्राधिकारी जणू काही, शासन असल्याप्रमाणे लागू होईल.

३. समुचित शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्याला योग्य वाटेल त्या सार्वजनिक संस्थेचे नाव अनुसूचित दाखल करता येईल व अशी भर जणू काही ती या अधिनियमाद्वारे घातली होती असे समजून परिणामक्षम होईल.

४. या कलमात "समुचित शासन" याचा अर्थ,—

(अ) छांवणी प्राधिकाऱ्याच्या बाबतीत किंवा प्रमुख बंदराच्या, बंदर अधिकाऱ्याच्या बाबतीत आणि ज्या संस्थेचे उद्देश केंद्र शासनाच्या मते, संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील सूची १ च्या कक्षेतील असतील, त्या संस्थेच्या बाबतीत, केंद्र सरकार असा आहे.

(ब) अन्य बाबतीत राज्य शासन असा आहे.

**स्पष्टीकरण.**—संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेच्या संबंधात, राज्य शासन याचा अर्थ, ज्या राज्यात संस्थेची नोंदणी झाली असे त्या राज्यातील शासन असा आहे.

**९. सैनिकांच्या इस्टेटीच्या संबंधात व्यावृत्ती.**——कलम ४ किंवा कलम ५ मधील कोणताही मजकूर ज्या कोणत्याही संपत्तीच्या प्रशासकीय प्रयोजनासाठी रेजिमेंटल ऋण अधिनियम, १८९३ लागू होत असेल त्या संपत्तीतील पैशास लागू असणार नाही.

# परिशिष्ट 'ब'

## (नियम-१३ पहावा)

अग्रिम/ना-परतावा रक्कम ज्या अभ्यासक्रमासाठी अनुज्ञेय आहे त्याची यादी :—

ज्या पाठ्यक्रमाचा तपशिल खाली दिला आहे ते तांत्रिक स्वरूपाचे समजण्यात यावेत.

१. मान्यताप्राप्त स्थानिक संस्थांनाकडून घेण्यात येणारे विविध-अभियांत्रिकी व तांत्रिक क्षेत्रामधील पदविका अभ्यासक्रम उदा. सिव्हील इंजिनिआरिंग, मेकॅनिकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग, टेलीकम्युनिकेशन/रेडिओ इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक इंजिनिअरिंग, मेटॉलर्जी, ॲटोमोबाईल इंजिनिअरिंग, टेक्सटाईल टेक्नॉलॉजी, लेदर टेक्नॉलॉजी, प्रिटींग टेक्नॉलॉजी, केमीकल टेक्नॉलॉजी वैगरे.

२. विद्यापीठे व मान्यताप्राप्त तांत्रिक संस्था यांच्याकडून घेण्यात येणारे इंजिनिअरिंग व टेक्नॉलॉजीच्या विविध क्षेत्रामधील पदवी अभ्यासक्रम उदा. सिव्हील इंजिनिअरिंग, मेकॅनिकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग, टेली-इलेक्ट्रीकल कम्युनिकेशन इंजिनिअरिंग आणि इलेक्ट्रॉनिक्स, मायनिंग इंजिनिअरिंग, मेटॉलर्जी, एरॉनाटिकल इंजिनिअरिंग, केमीकल इंजिनिअरिंग, आणि केमीकल टेक्स्टाईल टेक्नॉलॉजी, लेदर टेक्नॉलॉजी, फारमॅक, सेरॅमिक्स वैगरे.

३. विद्यापीठे व मान्यताप्राप्त संस्था यांच्याकडून घेतले जाणारे इंजिनिअरिंग व टेक्नॉलॉजी ह्यामधील व अन्य विविध क्षेत्रांमधील पदव्युत्तर अभ्यासक्रम.

४. मान्यताप्राप्त संस्थांकडून घेतले जाणारे आर्कीटेक्चर, शहर रचना आणि विविध क्षेत्रामधील पदवी अभ्यासक्रम.

५. मान्यताप्राप्त संस्थांकडून घेतले जाणारे कॉमर्समधील व सर्टीफिकेट अभ्यासक्रम.

६. मान्यताप्राप्त संस्थांकडून घेण्यात येणारे मॅनेजमेंटमधील पदविका अभ्यासक्रम.

७. मान्यताप्राप्त संस्थांकडून ॲग्रीकल्चर, व्हेटरीनरी सायन्स व इतर विषयामधील पदवीमधील पदविका अभ्यासक्रम.

८. ज्युनिअर टेक्नीकल शाळेमध्ये घेण्यात येणारे अभ्यासक्रम.

९. श्रम आणि सेवायोजन मंत्रालयाकडून घेण्यात येणारे इंडस्ट्रीअल ट्रेनिंग इन्स्टिट्युटचे अभ्यासक्रम.

१०. मान्यताप्राप्त संस्थांकडून घेण्यात येणारे ॲक्ट/अप्लाईड आर्ट आणि अन्य विषयांचे पदवी व पदविका अभ्यासक्रम.

११. मान्यताप्राप्त संस्थांकडून घेण्यात येणारे ड्राफ्ट्समनशिपचे अभ्यासक्रम.

१२. मान्यताप्राप्त संस्थाकडून घेण्यात येणारे वैद्यकीय अभ्यासक्रम. (ज्यामध्ये ॲलोपॅथीक, होमीओपॅथीक, आयुर्वेदिक आणि युनानी पद्धतीचा समावेश आहे.)

१३. बी.एस्.सी. यामध्ये होम-सायन्सचा समावेश आहे.

१४. मान्यताप्राप्त संस्थांकडून घेण्यात येणारे हॉटेल मॅनेजमेंटमधील पदविका अभ्यासक्रम.

१५. होम-सायन्समधील पदव्युत्तर अभ्यासक्रम.

१६. प्री-प्रोफेशनल कोर्स इन मेडीसीन, जर हा अभ्यासक्रम मेडीसिनचा नियमात ५ वर्षाच्या अभ्यासक्रमाचा भाग असेल तर.

१७. बायोकेमीस्ट्रीमध्ये पी. एच. डी.

१८. फिजीकल एज्युकेशनमधील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम.

१९. "लॉ" मधील पदवी व पदविका अभ्यासक्रम.

२०. मायक्रोबायोलॉजीमधील ऑनर्स कोर्स.

२१. असोसीएटशिप ऑफ द इन्स्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकाउन्टट्ंस.

२२. असोसीएटशिप ऑफ द इन्स्टिट्युट ऑफ कॉस्ट्स आणि वर्कस् अकाउन्टट्ंस.

२३. बिजनेस ॲडमिनिस्ट्रेशन किंवा मॅनेजमेंटमधील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम.

२४. हॉटेल मॅनेजमेंटमधील पदविका अभ्यासक्रम.

२५. स्टॅटिस्टीक्समधील एम. एस्. सी. अभ्यासक्रम.

२६. बॅचलर आणि डिग्री कोर्स् एज्युकेशन.

२७. इन्स्टीट्युट ऑफ कंपनी सेक्रेटरीशिप ऑफ इंडिया.

२८. कंपनी सेक्रेटरीशिप अभ्यासक्रम. मर्चंट शिप्सवरील नेव्हीगेटींग ऑफिसर्ससाठी "राजेंद्रा" या शैक्षणिक जहाजावरील प्री-सी ट्रेनिंग अभ्यासक्रम.

२९. डायरेक्टरेट ऑफ मरिन इंजिनिअरींग ट्रेनिंग यांचा मरिन इंजिनिअरींगचा अभ्यासक्रम.

# परिशिष्ट 'क'

## एकत्रित रकमेच्या वसूलीचे हप्ते निश्चित करण्याची पद्धत

| मुद्दा | स्पष्टीकरण |
|---|---|
| (१) जेव्हा आधीच्या अग्रिमाच्या/अग्रिमांच्या एका किंवा दोन महिन्यांची वसुली निलंबित असेल तेव्हा विहित पद्धतीनुसार एकत्रित रकमेची वसूली करण्यास **महाराष्ट्र सर्वसाधारण** भविष्य निर्वाह निधी नियम, १९९७ **मधील नियम** १३ (२) नुसार अग्रिम ज्या महिन्यात काढले त्या नंतरच्या महिन्यापासून प्रारंभ करावा किंवा कसे, | एकत्रित रकमांची वसूली नियम १३ (२) अनुसार करावी. आधीच्या अग्रिमाची/अग्रिमांची वसूली निलंबित ठेवू नये, आणि आधीच्या अग्रिमाची/अग्रिमांची थकबाकी एकत्रित रकमेच्या वसूलीबरोबर नेहमीच्या पद्धतीने करावी. यानुसार नवीन अग्रिम मंजूर करताना, एकत्रित वसूलीचा दर ज्या महिन्यात रक्कम देण्यात येणार आहे आणि आधिची अग्रिमाची थकबाकी व एकत्रित रकमेची वसूली याची सरासरी करून निश्चित करावा.<br><br>अगोदर योजिल्याप्रमाणे नवीन अग्रिम काढण्यात येणार नसेल तर मंजूरी प्राधिकारी वसूलीचा नवा दर निश्चित करेल आणि आवश्यकतेनुसार अग्रिमाची रक्कम मंजूर करेल. |
| (२) नियम १३ (२) नुसार एकत्रित अग्रिमाच्या हप्त्यांची वसूली नव्या अग्रिमाच्या रकमेसंबंधीने ठरविण्यात यावी की अग्रिमाची एकत्रित रक्कम लक्षात घेऊन करण्यात यावी. | अग्रिमाची एकत्रित रक्कम लक्षात घेऊन वसूलीच्या हप्त्यांची संख्या निश्चित करावी. जेव्हा एकत्रित रक्कम तीन महिन्यांच्या वेतनाहून जास्त असेल तेव्हा परतफेडीच्या हप्त्याची संख्या २४ पेक्षा जास्त असावी पण ३६ पेक्षा जास्त असू नये. |
| (३) वेगवेगळी अग्रिमे एकत्र केल्यावर प्रत्येक अग्रिमाची अभिन्नता रहात नसल्याने, जेव्हा वर्गणीदार नियम २४ खाली उर्वरित अग्रिमाचे रुपांतर करण्यासाठी अर्ज करतो तेव्हा विशिष्ट अग्रिमाची थकबाकी कशी मोजायची हा प्रश्न उपस्थित होतो. | असे स्पष्ट करण्यात येते की, जेथे एकत्रित केलेल्या सर्व अग्रिमांचे रूपांतर करता येत आहे आणि वर्गणीदाराने सर्व अग्रिमे रूपांतरित करण्याची विनंती केली आहे तेथे संपूर्ण थकबाकी अंतीमतः काढण्यास मंजूरी देण्यात यावी. |

| मुद्दा | स्पष्टीकरण |
| --- | --- |
| | ज्या प्रकरणी एका किंवा अनेक अग्रिमांपैकी एक किंवा एकापेक्षा जास्त अग्रिमे एकत्रित केली असतील किंवा पूर्वीच्या अग्रिमाचे रूपांतर करण्याबाबत अर्ज केला असल्यास प्रत्येक अग्रिम/अग्रिमे काल्पनिकरित्या आणि नियमात नमूद केल्यानुसार कमाल हप्त्यात अन्य अग्रिमांची वसुली करण्यात यावी. विशिष्ट अग्रिमाची/अग्रिमांची थकबाकी ज्याची वसूली काल्पनिकरित्या हप्ते निश्चित केल्यानुसार करण्यात आली असती त्यामधून कमी करून :— |
| | एक वर्गणीदार जो रुपये ४०० इतके वेतन दरमहा घेतो त्यास रु. ४०० इतका अग्रिम मंजूर झाला आहे. (क) जेव्हा अगोदरची दोन अग्रिमे रु. ९६० (अ) इतकी आहेत आणि रु. ६०० (ब) चालू आहे, अग्रिमाचे एकत्रिकरण करण्यात यावे. एकत्रिकरण करताना "अ" व "ब" अग्रिमाची थकबाकी ५६० आणि ३०० होती. या अग्रिमाच्या वसुलीच्या हप्त्यांची संख्या रु. ४० व रु. २५ दरमहा असावी. दुसऱ्या शब्दात १० व १२ हप्त्यात वसुल करण्यात यावी. रु. १२६० इतक्या एकत्रित रकमेची वसुली (रु. ५६० अधिक रु. ३०० अधिक रु. ४००) रु. ३५ च्या ३६ हप्त्यात करण्यात यावी. १० हप्त्यांची वसुली झाल्यावर एकत्रिकरण केल्यावर जेव्हा थकबाकी रु. ९१० असते तेव्हा वर्गणीदाराने पुढीलप्रमाणे अर्ज केल्यावर |

**मुद्दा**

## स्पष्टीकरण

(अ) "अ" अग्रिमाचे ना-परतावा रकमेत रूपांतर "अ" अग्रिमाची रक्कम वर्गणीदाराच्या तीन महिन्याच्या वेतनापेक्षा कमी असेल तर त्याला २६० रुपयाच्या विशिष्ट अग्रिमाची वसुली काल्पनिकरित्या ४० रुपयाच्या २४ हप्त्यात निश्चित करावी. ज्या महिन्यात रूपांतर करण्याबाबत अर्ज केला तोपर्यंत रु. ४० प्रत्येकी प्रमाणे फक्त २० हप्ते वसूल झाले होते. उदा. एकत्रित करण्यापूर्वी १० हप्ते व नंतर १० हप्ते त्यानंतर त्याला रु. १६० (रु. ९६०-८००) इतक्या अग्रिमाचे ना-परतावा रकमेत रूपांतर करण्यास परवानगी देण्यात यावी.

(ब) "ब" अग्रिमाचे ना-परताव्यात रूपांतर "ब" म्हणून मंजूर केलेले अग्रिम सुद्धा वर्गणीदाराच्या तीन महिन्याच्या वेतनापेक्षा कमी असल्यास रु. ६०० इतक्या "ब" अग्रिमाची वसुली प्रत्येकी रु. २५ इतक्या २४ हप्त्यात काल्पनिकरित्या निश्चित करावी. ना-परताव्यास रूपांतर करावयाचा अर्ज प्राप्त होईपर्यंत रु. २५ इतके २२ हप्ते वसूल झाले असल्यास एकत्रिकरणापूर्वी १२ हप्ते व १० हप्त्यानंतर त्यास रु. ५० इतक्या रूपांतरास परवानगी देण्यात यावी. (रु. ६००-५५०).

(क) "क" अग्रिमाचे रूपांतर रु. ४०० इतक्या अग्रिमाची वसुली रु. १६ इतक्या ४० हप्त्यात काल्पनिकरित्या निश्चित करावी. १० हप्त्यांची वसुली झाल्यानंतर त्याने रूपांतरासाठी अर्ज केल्यास रु. २३३ (रु. ४००-१६७) इतक्या रकमेच्या रुपांतरास परवानगी देण्यात यावी. वसुली केलेली रक्कम पूर्ण रुपयात रूपांतरित करावी.

| मुद्दा | स्पष्टीकरण |
|---|---|
| ४. एकत्रित केलेल्या अग्रिमाचा भाग ना-परताव्यास रूपांतर करताना ते कोणत्या दराने व किती हप्त्यात शिल्लक रकमेची वसुली करावी. | एकत्रित अग्रिमाच्या भागात ना-परताव्यास रूपांतर करण्यास मान्यता दिल्यावर मंजुरी अधिकाऱ्याने एकत्रित अग्रिमाची किती थकबाकी शिल्लक आहे ते पहावे. एकत्रित अग्रिमाची थकबाकी नवे अग्रिम आहे असे मानण्यात यावे व नियमात नमूद केलेल्या किमान हप्त्यांच्या संख्येपेक्षा जास्त नाही असे हप्ते व वसुलीचा दर निश्चित करावा. उदा. रु. १,२६० या एकत्रित अग्रिमाची थकबाकी (रु. ५६० + रु. ३०० + ४००) रु. ३५ चे १० हप्ते वसूल झाल्यावर (रु. ५६० व रु. ३००) इतक्या अग्रिमाचे रूपांतर करण्याचा अर्ज प्राप्त झाल्यावर रु. ७०० एकत्रित अग्रिम १,२६० पेक्षा कमी असल्यास रु. ३५ च्या १० हप्त्यांची वसुली झाल्यावर.<br><br>(२) (अ) रु. ५६० व रु. ३०० इतक्या अग्रिमाचे रूपांतरासाठी अर्ज प्राप्त होईपर्यंत.<br><br>(ब) रु. ५६० इतक्या अग्रिमाची काल्पनिक थकबाकी रु. १६० चे ना-परताव्यात रूपांतर,<br><br>(क) रु. ३०० च्या अग्रिमाची काल्पनिक थकबाकी रु. ५० चे ना-परताव्यात रूपांतर,<br><br>(३) १,२६० इतक्या एकत्रित अग्रिमाची थकबाकी रु. ७०० हे नवे अग्रिम समजण्यात यावे व नियमात नमूद केलेल्या कमाल मर्यादेपेक्षा जास्त नाही अशा नव्या दराने त्याच्या वसुलीस काल्पनिक मंजुरी देण्यात यावी. |

A-924—17

शामुना–अे-९२४–अससाप्रविमुं–५-२००८–६,१५०–पु.-पीसी ४*